LATUR

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय लातूर

शैक्षणिक वर्ष 2022-2023

इतिहास विभाग

प्रकल्प लेखन

प्रकल्पाचे शिर्षक

" प्राचीन स्थळांचा शोध "

मार्गदर्शक

डॉ.कांबळे बी.ए

डॉ. विजयकुमार मेकेवाड

प्रकल्प लेखनकार

बी.ए.प्रथम-द्वितीय, वर्षाचे विद्यार्थी

1) मडके भगवान शरद
2) दरकासे विकास सागर
3) चौहान अस्था सुरेश (बी. ए.द्वितीय)
4) डाकोरे निखिल साहेबराव (बी.ए.द्वितीय)

Scanned with OKEN Scanner

LATUR

# प्रकल्प लेखन

## प्राचीन स्थळांचा शोध

### उद्दिष्टे

1)मानवी विकासाच्या टप्प्याचा शोध घेणे

2)मानवी जीवनातील विविध पैलू चा अभ्यास करणे

3)मानवी जीवनातील भौगोलिक समस्यांचा आढावा घेणे

### उद्देश/निष्कर्ष

1)प्राचीन काळाच्या अभ्यासातून झालेल्या चुका टाळून विद्यार्थी उत्तम जीवन जगू शकतो

2)विद्यार्थ्यांच्या मनात पुरातत्त्वक्षेत्राविषयी आवड निर्माण होते3)विद्यार्थ्यांच्या मनात धार्मिक

स्थळे प्राचीन वास्तू याबद्दल संवर्धनाची भावना विकसित होते.

Scanned with OKEN Scanner

LATUR

## : प्राचीन स्थळांचा शोध

उत्खनन हे पुरातत्त्व विद्येचे सर्वात महत्त्वाचे अंग आहे, हे एकदा मान्य केले म्हणजे ते कोठे करावयाचे हा प्रश्न साहजिकच पुढे उभा राहतो. सर्वसामान्य माणसाला पुरातत्त्वज्ञ प्राचीन स्थळे कशी शोधून काढतात याचा नेहमी अचंबा वाटतो. किंबहुना पुरातत्त्वज्ञाला ते अमुक एक ठिकाण उत्खननासाठी का निवडले असा प्रश्न नेहमी विचारतात. तेव्हा प्राचीन स्थळे शोधून काढणे हे उत्खननापूर्वी महत्त्वाचे काम आहे यात शंका नाही. प्राचीन स्थळे शोधून काढण्याच्या ज्या पद्धती आहेत त्यांपैकी काही शास्त्रीय पद्धती असून त्या अलिकडे नव्याने शोधून काढण्यात आल्या आहेत.

काही महत्त्वाची प्राचीन स्थळे तेथे इतर काही काम चालू असल्यामुळे, आकस्मिकरित्या उजेडात आली आहेत. उदाहरण द्यावयाचे झाल्यास बहादराबाद (जिल्हा डेहराडून, उत्तरप्रदेश) या स्थळाचे देता येईल. तेथे १९५३ साली कालवा खणण्याचे काम चालू असता काही तांब्याचे अलंकार, हत्यारे आणि शस्त्रे व वैशिष्ट्यपूर्ण खापरेही सापडली. ज्या मजुरांना त्या वस्तू सापडल्या त्यांना त्याची काहीच कल्पना नसल्यामुळे तेथील अधिकाऱ्यांनी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या अधिकाऱ्यांना पाचारण केले. त्यांच्या तपासणीमध्ये तेथील अवशेष सुमारे साडेतीन हजार वर्षांपूर्वीचे असल्याचे सिद्ध झाले. तसे पाहिल्यास हडप्पा या सिंधु संस्कृतीच्या शहराचा शोधही असाच आकस्मिकरित्या लागला. गेल्या शतकाच्या मध्यास लाहोर-मुलतान रेल्वेचे काम चालू असता तेथील कामासाठी हडप्पा येथील प्राचीन बांधकामाच्या विटांचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग केला गेला. त्यामुळे जनरल अलेक्झांडर कनिंगहॅम या इंजिनियरचे लक्ष हडप्पाकडे वेधले गेले. परंतु तेथील संस्कृती साडेचारहजार वर्षांइतकी प्राचीन आहे हे पन्नास वर्षांपूर्वी तेथे केलेल्या उत्खननामुळे सिद्ध झाले.

परंतु अशा प्रकारे केवळ योगायोगामुळे फारच थोडी प्राचीन स्थळे उजेडात येतात. त्यामुळे पुरातत्त्वाला अशा योगायोगावर विसंबून राहता येत नाही. त्यासाठी त्याला स्वतंत्रपणे अन्वेषणाचा (exploration) कार्यक्रम आखून त्याप्रमाणे प्राचीन स्थळांची पाहणी करावी लागते आणि केवळ त्यातूनच त्याला हव्या असलेल्या ठराविक प्राचीन स्थळांचा शोध लावता येतो. या संदर्भात कोणत्या प्रकारची प्राचीन स्थळे कोठे आढळतील याचा उल्लेख करणे अगत्याचे आहे. अश्मयुगीन स्थळे शोधावयाची असल्यास नदीच्या काठी अन्वेषण करावे लागते. या काळातील मानव जेथे शक्य असेल तेथे नैसर्गिक गुहांतून राहत असे. या प्रकारच्या गुहा नदीच्या काठापासून बहुधा दूर अंतरावर असतात. आंध्र प्रदेशातील गुंटूर जिल्ह्यात अश्मयुगीन मानवाने वस्ती केलेल्या गुहा आहेत. तथापि हल्लीप्रमाणेच प्राचीन काळीही पाणी ही मानवाची सर्वात मोठी गरज असल्यामुळे नद्या, बारमास वाहणारे नाले आणि तळी यांच्या तीरावर किंवा त्यांच्या जवळपास प्राचीन मानव वस्ती करून राहत असे. त्यामुळे प्राचीन स्थळे शोधण्यासाठी जेथे बारमास पाणी उपलब्ध असेल अशा ठिकाणी संशोधन करावे लागते. परंतु हजारो वर्षांपूर्वी हवामानात बदल होऊन काही प्राचीन नद्या लुप्त झाल्या आहेत. भूकंपामुळे किंवा पावसाचे मान कमी झाल्यामुळे काही वेळा असे बदल घडून आले आहेत. प्राचीन सरस्वती नदी आपणा सर्वांना माहित आहे. वैदिक वाङ्मयात तिचा वारंवार उल्लेख येतो; परंतु सुमारे साडेतीन हजार वर्षांपूर्वी हवामानात घडून आलेल्या बदलामुळे ती नदी आटून



Scanned with OKEN Scanner

LATUR

गेली आणि आज तेथे सर्वत्र वैराण प्रदेश निर्माण झाला आहे. राजस्थानातील श्रीगंगानगर जिल्ह्यात सरस्वती आणि दृषद्वती या दोन लुप्त झालेल्या नद्यांच्या तीरावर सिंधु संस्कृतीची प्राचीन स्थळे सापडली आहेत. आज तरी तेथे पाण्याचा मागमूस नसला तरी प्राचीन काळी तेथे नद्या होत्या हा प्राचीन स्थळांचा शोध घेताना ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

नद्यांच्या काठी प्राचीन काळी एकामागून एक मानवी वसाहती होऊन त्यांमुळे तेथे अवशेषांचे एक टेकाड (mound) बनते (चित्र १). हे टेकाड कसे बनते हे जर जाणून घेण्याची इच्छा असेल तर एखाद्या उजाड वस्तीवर जावे. एखादी इमारत जर तेथे बरीच वर्षे कोणी राहिलेले नसले तर पडीक बनते. काही कालानंतर ती मोडकळीस येऊन, तिचे छप्पर आणि भिंती पडून भुईसपाट होतील आणि त्या अवशेषांचा एक ढिगारा बनेल. कालांतराने त्यावर वाऱ्याने उडून आलेल्या मातीचे थर बसतील आणि त्यामुळे ते अवशेष जमिनीशी एकरूप होऊन जातील. अशा वस्तुचा मानवाने जर जाणूनबुजून विध्वंस केला असेल तरीसुद्धा असाच ढिगारा बनेल. अशा प्रकारे जर एखादे संबंध गाव मोडकळीस येऊन उजाड झाले तर त्याच्या अवशेषांचे टेकाड खूपच मोठे आणि विस्तृत बनेल.

उजाड झालेल्या गावी बहुधा कालांतराने पुन्हा लोक येतात आणि वस्ती करून राहतात. त्यांच्या घरांचीही ते गाव सोडून गेल्यावर अशीच गत होते. त्यामुळे अवशेषांचे टेकाड उंच बनते. एखाद्या स्थळी जर बऱ्याच वेळा वस्ती झालेली असेल तर तेथील टेकाड हे खूपच विस्तृत आणि उंच बनेल. अशा ठिकाणी उत्खनन करणे हे नेहमी फायदेशीर ठरते.

प्राचीन अवशेषांनी समृद्ध असलेल्या गढ्या बऱ्याच वेळा आसपास राहणाऱ्या लोकांचे लक्ष आकर्षित करतात. वर्षानुवर्षे ऊन-पावसाच्या माऱ्यामुळे गढीचा काही भाग ढासळतो. काही ठिकाणी पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या घळ्या निर्माण होतात. या घळ्यांतून आणि ढासळलेल्या भागातून पुष्कळवेळा आत असलेली नाणी, मणी, खापरांचे तुकडे असे अनेक अवशेष उजेडात येतात. ते पाहून आसपासचे लोक केवळ कुतूहल म्हणून ठिकठिकाणी खड्डे पाडून, गुप्तधन मिळवण्याच्या आशेने खोदकाम करतात. असा प्रकार जगाच्या निरनिराळ्या प्राचीन स्थळी चालू होता आणि आजही आहे. भारतातसुद्धा तो चालू आहे आणि त्यामुळे कित्येक प्राचीन अवशेष नाश पावले आहेत.

खेड्यातील लोक प्राचीन गढ्यांची माती मोठ्या प्रमाणावर उकरून नेतात आणि आपल्या घरात सारविण्यासाठी गिलावा करण्यासाठी किंवा विटा तयार करण्यासाठई तिचा उपयोग करतात. जुन्या गढ्यातील मातीत सॉल्टपिटरसारखी अनेक नैसर्गिक द्रव्ये असतात. त्यामुळे तिचा शेतात खतासाठीही उपयोग केला जातो. परंतु असे ठिकठिकाणी खड्डे खोदल्यामुळे एखाद्या गढीचे पद्धतशीर उत्खनन करणे अशक्य होऊन बसते. अर्थात क्वचित प्रसंगी ते फायदेशीरही ठरते. माती उकरण्यामुळे पुष्कळ वेळा गढीतील प्राचीन अवशेष दिसू लागतात. तसेच उकरलेला भाग गढीच्या निरनिराळ्या थरांचा अभ्यास करण्यास उत्खनकाला उपयोगी ठरतो. यावरून ती गढी उत्खनन करण्यास योग्य आहे किंवा कसे हे ठरवणे सोपे जाते.

गढ्या जर उंच आणि विस्तृत असतील तर त्या भारतीय सर्वेक्षण खात्याने (Survey of India) तयार केलेल् १ इंचास १ मैल या प्रमाणात असणाऱ्या नकाशात दर्शविलेल्या असतात. परंतु लहान गढ्या मात्र नकाशात सापडणार नाहीत. त्यांच्या शोधार्थ गावोगाव फिरावे लागते. एखाद्या पुरातत्त्वज्ञाने जर

एखाद्या विशिष्ट प्रदेशातील प्रत्येक गावची पाहणी करून तेथील गढ्यांचा अभ्यास केला तर त्या भागात प्राचीन काळापासून कसकशी वस्ती होत गेली याचे आकलन त्याला उत्खननन न करताही होईल. अर्थात काही ठिकाणी चाचणी उत्खनन (Trial trenches) केल्यास त्याला अधिक सबळ पुरावा उजेडात आणता येईल.

वर नमुद केल्याप्रमाणे प्राचीन अवशेषांची ही टेकाडे जमीनसपाटीपासून उंचावर असतात. परंतु काही वेळा पावसामुळे, जमिनीच्या धुपण्यामुळे किंवा लागवडीमुळे या गढ्या सपाट होऊन जातात. क्वचित प्रसंगी महापुरामुळे भोवतालच्या प्रदेशाची उंची वाढते आणि गढी त्यात झाकली जाते, किंवा तीव्र पुराच्या गाळाचा एक प्रचंड थर बसतो अशा वेळी त्या ठिकाणी प्राचीन अवशेषांनी समृद्ध असलेली गढी ओळखणे अशक्यप्राय होऊन जाते. कधी काळी तलाव खोदण्यासाठी किंवा आणखी एखाद्या तत्सम कारणासाठी तर तेथे खोदकाम झाले तरच तेथील प्राचीन अवशेष उजेडात येण्याचा संभव असतो. नाहीतर शतकानुशतके त्यांना जमिनीत पडून राहावे लागते.

**प्राचीन वाङ्मय**

प्राचीन स्थळांचा शोध करताना प्राचीन वाङ्मयात उल्लेखिलेल्या नगरींचा आणि गावांचा विचार करणे आवश्यक आहे. सुदैवाने या बाबतीत आपले प्राचीन भारतीय वाङ्मय अत्यंत समृद्ध आहे. रामायण, महाभारत आणि पुराणे यात वारंवार प्राचीन स्थळांचे केवळ उल्लेखच नव्हे तर त्यांची वर्णनेही येतात. बौद्ध जातककथांतूनही अशा प्रकारचे उल्लेख आढळतात. आपल्या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वारंवार वस्ती झाल्याने तेथेही प्राचीन अवशेष सापडतात. वाराणसी, मथुरा, द्वारका, प्रयाग (अलाहाबाद), प्रभास पाटण (सोमनाथ), उज्जैन इत्यादी तीर्थक्षेत्रे अतिप्राचीन म्हणून प्रसिद्ध आहेत. वाङ्मयातही त्यांची माहिती मिळते. प्राचीन साहित्यात त्यांचे उल्लेख आहेत. याचाच अर्थ तेथे प्राचीन काळी वस्ती होती. त्यामुळे प्राचीन वाङ्मयात उल्लेखिलेल्या स्थळांचा आपल्याला शोध लावता येणे सहज शक्य होते. अशा प्रकारे संशोधन करून एका अत्यंत महत्त्वपूर्ण प्राचीन संस्कृतीचा शोध पुरातत्त्व सर्वेक्षणाचे एक माजी अधिकारी आणि हल्ली सिमला येथील प्रगत अभ्यास संस्थेचे प्रमुख बृजवासी लाल यांनी लावला. १९५०-५१ मध्ये हस्तिनापूर (जिल्हा मीरत, उत्तर प्रदेश) येथे उत्खनन करीत असता सर्वात खालील थरात त्यांना एका वैशिष्ट्यपूर्ण संस्कृतीचे अवशेष सापडले. याच प्रकारचे अवशेष त्यापूर्वी रावबहादूर काशिनाथपंत दीक्षितांना अहिच्छत्रा (जिल्हा बरेली, उत्तर प्रदेश) येथे सापडले होते. त्यामुळे प्रा. लाल यांनी महाभारतात उल्लेखिलेल्या स्थळांची यादी तयार करून ती स्थळे हल्ली कोठे आहेत याचे संशोधन केले. त्यामध्येच खुद्द हस्तिनापूर, दिल्ली (इंद्रप्रस्थ), बागपत (व्याघ्रप्रस्थ), सोनपत (सुवर्णप्रस्थ), पानिपत (पाणिप्रस्थ), बर्नावा (वारणावत) इत्यादी स्थळे होती. या सर्व ठिकाणी प्रा. लाल यांना हस्तिनापूर येथे आढळलेल्या संस्कृतीचे अवशेष सापडले त्यामुळे महाभारतातील संस्कृतीचा शोध त्यांना लावता आला.

बिकानेरच्या वाळवंटातील प्राचीन स्थळांचा शोध प्रख्यात संशोधक ऑरेल स्टाईन यांनी असाच लावला. सरस्वती नदीचा उल्लेख वैदिक वाङ्मयात येतो. सरस्वती नदी वाळवंटात जरी लुप्त झाली असली तरी तेथे हल्ली एक छोटासा नाला आहे. त्याचे नाव सरसुती असे आहे. या नाल्याच्या म्हणजेच प्राचीन सरस्वतीच्या काठी स्टाइन यांना अनेक प्राचीन स्थळांचा शोध लागला. हे काम पुढे पुरातत्त्व सर्वेक्षण खात्याचे श्री अमलानंद घोष यांनी चालू ठेवले त्यांना तेथे सिंधु संस्कृतीची अनेक स्थळे सापडली.

Scanned with OKEN Scanner

LATUR

तेथील कालीबंगन हे स्थळ चार हजार वर्षांपूर्वी सिंधू संस्कृतीचे एक मोठे शहर होते असे तेथे मोठ्या प्रमाणावर केलेल्या उत्खननावरून सिद्ध झाले आहे. कुरुक्षेत्र विद्यापीठाचे डॉ. सूरज भान यांनीही अलिकडे दृशद्वती नदीच्या खोऱ्यात संशोधन करण्यास सुरुवात केली आहे. त्यांना सापडलेली काही स्थळे चार हजार वर्षांइतकी प्राचीन आहेत.

## परकीयांची इतिवृत्ते

भारतात प्राचीन काळी जे प्रवासी येऊन गेले त्यांनी आपल्या प्रवासवर्णनात येथील प्राचीन स्थळांचे उल्लेख या वर्णने दिली आहे. चिनी प्रवाशांची इतिवृत्ते या बाबतीत फार मोलाची आहेत. फा-हियान, ह्युएन-त्संग व इ-त्सिंग यांनी भारतातील बौद्ध तीर्थक्षेत्रांना भेटी दिल्या. त्यांचे वास्तव्य प्रामुख्याने उत्तर भारतात होते. त्यांच्या प्रवासवर्णनातील स्थळांचे संशोधन अलेक्झांडर कनिंगहॅम यांनी केले. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आल्यानंतर सुरुवातीस त्यांनी ज्या प्राचीन स्थळांचा शोध लावला ती सर्व स्थळे त्यांनी चिनी प्रवाशांच्या इतिवृत्तातून घेतली होती. किंबहुना त्यामुळेच त्यांना उत्तर भारतातील अनेक प्राचीन स्थळांचा शोध लावता आला.

परकीय इतिवृत्तांमध्ये ग्रीक आणि रोमन इतिवृत्तांचाही समावेश केला पाहिजे. अलेक्झांडरबरोबर आलेल्या इतिहासकारांनी तत्कालीन भारतातील परिस्थितीसंबंधी लिखाण केले आहे. त्यानंतर चंद्रगुप्त मौर्यांच्या दरबारी असलेल्या मेगॅस्थेनिस या ग्रीक वकिलाने (इ.स.पू. चौथे शतक) मौर्यकालीन भारतासंबंधीची माहिती आपल्या 'इंडिका' या ग्रंथात लिहून ठेवली आहेय हा ग्रंथ आज पूर्णतया जरी उपलब्ध नसला तरी त्यावरून घेतलेली माहिती नंतरच्या काळातील साहित्यात सापडते. टॉलेमीच्या भूगोलात भारताच्या भौगोलिक परिस्थितीचाही थोडाफार उल्लेख येतो. जस्टिन व स्ट्रॅबो यांच्या ग्रंथातही भारतासंबंधीची इ.स. च्या पहिल्या-दुसऱ्या शतकातील माहिती दिलेली आहे; परंतु या सर्वांपेक्षा अत्यंत काटेकोर माहिती देणारा व विश्वसनीय असा ग्रंथ म्हणजे एका अज्ञात ग्रीक खलाशाने लिहिलेला 'दि पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रिअन सी' हा होय, हा इ.स. पहिल्या शतकाच्या अखेरीस लिहिलेला असून त्यात प्रामुख्याने व्यापाऱ्यांना उपयुक्त अशी माहिती दिलेली आहे. भारतातील औद्योगिक शहरे व व्यापारी बाजारपेठा, तेथे तयार होणारा माल आणि भारताची, प्रामुख्याने पश्चिम किनाऱ्यावरील बंदरे व त्यातून होणारी आयात-निर्यात यांचे सविस्तर वर्णन या ग्रंथात दिलेले आहे. या ग्रंथात भारतीय शहरांची नावे मात्र ग्रीक पद्धतीची दिलेली आहेत. उदा., हल्लीचे गुजराथेतील भडोच याचा प्राचीन वाङ्मयात व कोरीव लेखात भृगुकच्छ असा उल्लेख केलेला आहे. परंतु उपरोक्त ग्रीक ग्रंथात त्याचे बॅरिगाझा असे नाव दिलेले आहे. तसेच लेण्यासाठी प्रसिद्ध असलेले पितळखोरा (जिल्हा औरंगाबाद, महाराष्ट्र) याचे नाव पेट्रिगॅला असे दिलेले आहे. ते त्याच्या संस्कृत पीतंगल्य या नावाचे ग्रीक रूप होय. अर्थात याप्रमाणे गावांचा शोध लावणे थोडे अवघड होते.

## प्राचीन कोरीव लेख

प्राचीन कोरीव लेखांतही प्राचीन स्थळांचे अनेक उल्लेख येतात. शिलाशासनात आणि ताम्रशासनात दान दिलेल्या गावांची माहिती त्यांच्या चतुःसीमांसह दिलेली असते. त्यामुळे ती गावे हल्ली कोठे आहेत याचा शोध घेणे सहज शक्य होते. परंतु अनेक वेळा ताम्रपट हे त्यांच्या मूळच्या स्थानापासून खूप दुरवर नेले जातात व त्यामुळे मूळ ताम्रपट कोठून दिला हे प्रयासाने शोधून काढावे लागते. वऱ्हाडात राज्य करणाऱ्या



Scanned with OKEN Scanner

LATUR

वाकाटक घराण्याच्या प्रभावती गुप्त (चौथे शतक) या राणीचा मूळ इंदूरजवळ दिलेला ताम्रपट काही वर्षांपूर्वी पुण्यात एका तांबटाकडे सापडला. अशा वेळी ताम्रपटातील गावे शोधून काढून तो मूळ कोठे दिला होता याचा शोध घेणे अशक्यप्राय होते. परंतु ताम्रपटांतून व शिलालेखांतून आपल्याला शेकडो गावांची माहिती मिळते व त्यावरून एखाद्या विशिष्ट प्रदेशातील स्थळांची जंत्री करून ती शोधून काढता येतात.

महापाषाणीय (मेगॅलिथिक) संस्कृतीच्या कबरी शोधून काढणे काही वेळा सहज शक्य होते. दक्षिण भारतात आणि मध्य भारतात ही संस्कृती इ.स.पू. सातवे शतक ते दुसरे शतक या काळात नांदली. हे लोक घोड्यावरून हिंडत असत. त्यांच्याजवळ अनेक प्रकारची लोखंडी शस्त्रास्त्रे होती. ते एके ठिकाणी घरे बांधून फार काळ राहत नसत. परंतु मृताचे दफन मात्र ते मोठ्या इतमामाने करीत. मृताला पुरण्यासाठी प्रथम जमिनीत खोल खड्डा खणीत. त्यात शव पुरल्यावर त्याचे अलंकार, शस्त्रे आणि अन्नपाण्याने भरलेली भांडी ठेवीत. काही वेळा सजविलेला घोडाही मृताबरोबर पुरला जाई. खड्ड्यात माती लोटल्यानंतर त्या स्थळाची नासधूस होऊ नये, म्हणून कबरीच्या भोवताली प्रचंड मोठे दगड वृत्ताकार ठेवीत (चित्र २). अशा कबरी शेकड्याने सापडतात. या कबरी ज्या गावाच्या आसमंतात आहेत त्या गावाच्या नावात 'कल' किंवा 'गल्' हा द्राविडी भाषेतील प्रत्यय लावला गेला (उदा. रांगनकल), दक्षिण भारतातील 'कल्' किंवा 'गल्' (म्हणजे दगड) किंवा 'कल्लू' किंवा 'गल्लू' इत्यादी प्रत्यय अंती असलेल्या गावात या महापाषाणीय व कबरी हमखास सापडतात.

संस्कृतप्रचुर नावे असलेल्या गावांतही बहुधा प्राचीन अवशेषांची टेकाडे सापडतात. या प्रकारची अनेक उदाहरणे देता येतील. त्यांपैकी वाराणसी, मथुरा इत्यादी गावांचा उल्लेख पूर्वी केला आहे. परंतु अनेक वेळा मूळ संस्कृत नावाचे प्राकृतीकरण होऊन गावाचे हल्लीचे नाव निराळे म्हणजे ओळखू न येण्याइतके असते. नगर जिल्ह्यातील नेवासे गावचे उदाहरण या संदर्भात देता येईल. ज्ञानेश्वरांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या या गावाचे मूळ नाव 'निधिवास' होते हे कोरीव लेखांवरून स्पष्ट होते. त्याचे पुढे 'निइवास' असे प्राकृत रूप होऊन त्यातून हल्लीचे नेवासे हे नाव तयार झाले. तसेच मराठवाड्यात औरंगाबादजवळील भोकरदन या गावाबाबत म्हणता येईल. सांची येथील कोरीव लेखात भोगवर्धन गावच्या काही लोकांची दाने नमूद केली आहेत. पुराणात भोगवर्धन हे गोदावरीच्या खोऱ्यात असल्याचा उल्लेख आहे. भोकरदन येथील उत्खननावरून तेथील सर्वप्रथम वस्ती इ.स.पू. तिसऱ्या शतकात झाली हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे कोरीव लेखातील व पुराणात उल्लेखिलेले भोगवर्धन म्हणजे हल्लीचे भोकरदन हे निर्विवाद सिद्ध होते. अशी शेकडो उदाहरणे देता येतील.

**सर्वेक्षण नकाशे**

नकाशांच्या साहाय्यानेही प्राचीन स्थळांचा शोध लावता येतो. युरोपात तेथील देशांचे जे नकाशे उपलब्ध आहेत त्यांचे प्रमाण १६ इंचास १ मैल असे असते. त्यामुळे नकाशात अत्यंत बारीकसारीक भूवैशिष्ट्ये दाखविली जातात. आपल्याकडे मात्र या प्रमाणाचे नकाशे तयार केलेले नाहीत. भारतीय सर्वेक्षण खात्याने (सर्व्हे ऑफ इंडिया) १ इंचास १ मैल या प्रमाणाचे संपूर्ण भारताचे नकाशे प्रसिद्ध केले आहेत. प्राचीन स्थळांचा शोध घेण्यास त्याचा बहुमोल उपयोग होतो. या नकाशात बारमास पाणी असलेले झरे, नद्या, नाले, नैसर्गिक गुहा आणि नदीच्या आसमंतातील मंचक (terraces) इत्यादी दर्शविलेले असतात. पाण्याचा बारमास साठा जेथे उपलब्ध असेल ते असे ठिकाण प्राचीन मानव वस्ती करण्यास



Scanned with OKEN Scanner

LATUR

निवडीत असे, याचा उल्लेख पूर्वी केला आहे. त्यामुळे नकाशात अशा प्रकारचा पाण्याचा साठा कोठे आहे याची माहिती करून घेतल्यास त्याच्या अनुषंगाने प्राचीन स्थळे शोधण्यास मदत होते.

नदी वळसे घेत जाते हे आपणा सर्वांना माहीत आहे. परंतु नदी वळण का घेते हे जाणून घेण्याच्या भानगडीत आपण सहसा पडत नाही. नदीच्या प्रवाहास अडसर निर्माण झाला म्हणजे नदी वळण घेते. उदा., एखादी छोटी टेकडी किंवा खडक मध्ये आला म्हणजे अर्थातच नदीचा प्रवाह वळसा घेतो. हे वळण ९०° चे आसपास असले म्हणजे खडकामुळे नदीच्या पात्रात एक मोठा डोह निर्माण होतो. हा डोह कालांतराने खोल आणि विस्तृत होतो. आसपास खडक असल्याने डोहातील पाणी स्वच्छ राहते. तेथे मासे, कासवे इत्यादी जलचरांचे वास्तव्य होते. डोहातील मासमासे व भरपूर पाणी आणि त्यातील मासे व इतर जलचर यांमुळे वस्ती करण्यासाठी प्राचीन मानव तेथे आकृष्ट होत असे. अश्मयुगीन मानवालाही नदीच्या काठी वास्तव्य करणे भाग पडे. हत्यारासाठी लागणारा दगड नदीच्या पात्रात विपुल प्रमाणात मिळे. तसेच पाणी पिण्यासाठी जनावरे नदीवर येत असत. त्यामुळे नदीकाठी शिकारेही त्याला सहज मिळे. त्यामुळे अश्मयुगापासून आजपर्यंत मानवी वस्ती सर्वसाधारणपणे नदीच्या काठी होत आली आहे.

सर्वेक्षण खात्याच्या वर उल्लेखिलेल्या नकाशात नदीचे पात्र किती विस्तृत आहे, त्यात दगडगोटे कोठे आहेतस तसेच पाणी कोठे व किती आहे हे दर्शविलेले असते.

त्याशिवाय नदी लाखो वर्षे वाहत गेल्यामुळे तिच्या दोन्ही बाजूला उंच तट निर्माण झालेले असतात. या तटामध्ये वाळूचे आणि नदीने वाहून आणलेल्या गाळाचे एकावर एक थर असतात. हे तटही उंच असल्यास नकाशात दर्शविलेले असतात (चित्र ३). या थरांमध्ये अश्मयुगीन हत्यारे व अश्मास्थी (fossils) सापडण्याचा संभव असतो तसेच आसपास असलेले मंचक (terraces) काही वेळा नकाशात दाखविलेले असतात. त्यामुळे नदी प्राचीन काळी कशा वाहत होती हे समजून घेता येते.

महाराष्ट्रातील अश्मयुगीन मानवाची हत्यारे काळ्या पाषाणाची (Trap, Basalt) आहेत. हत्यारासाठी लागणारा उत्कृष्ट प्रतीचा दगड हा डाईक मध्ये असतो. काळ्या पाषाणाच्या भित्ती (dykes) या लांबच लांब, एकसंध असतात. काही वेळा या भिंती दोन ते चार मैल लांबीच्या असतात. नकाशामध्येही त्या दर्शविलेल्या असतात. नदीच्या जवळपास त्या काही ठिकाणी असतात. अशी ठिकाणे नकाशातून शोधून काढून तेथे अश्मयुगीन अवशेष सापडतात किंवा कसे याचा शोध घेता येतो. नाशिकच्या जवळ गोवर्धन येथे गोदावरीच्या पात्रात अशीच एक भित्ती (dyke) आहे. जवळच गंगापूरला अश्मयुगीन हत्यारे फार मोठ्या प्रमाणावर सापडली आहेत, याचा या संदर्भात आवर्जून उल्लेख केला पाहिजे.

नकाशात उजाड झालेली गावे दर्शविण्यासाठी फुलीचे चिन्ह असते. सर्वसाधारणपणे या उजाड वस्त्या प्राचीन असतात असे दिसून येते. नकाशातील अशा उजाड गावांची पाहणी केल्यास अनेक प्राचीन स्थळांचा शोध लावता येईल. प्राचीन मंदिरे व इतर वास्तू, लेणी इत्यादी अवशेषही नकाशात दाखविलेले असतात. त्या ठिकाणीसुद्धा प्राचीन वस्तीचे अवशेष सापडण्याचा संभव असतो.

प्राचीन अवशेषांनी समृद्ध असणाऱ्या टेकड्यांना भारतातील निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या नावे आहेत. सिंधप्रांतात 'दडो' (उदा.: मोहेंजोदडो, चन्हुदडो इ.) राजस्थानात थेडी उत्तर भारतात 'टिला', गुजराथेत 'टिंबो' आणि महाराष्ट्रात 'पांढरी' ही सर्व नावे प्राचीन अवशेषांच्या टेकड्यांना दिलेली



Scanned with OKEN Scanner

आढळतात. महाराष्ट्रात त्यांना पांढरी का म्हणतात हे प्राचीन टेकडीचे एकंदरीत स्वरूप पाहिल्यास चटकन ध्यानात येण्यासारखे आहे. एकाच ठिकाणी शतकानुशतके मानवी वस्ती होऊन गेल्यामुळे, घरातील राख-राखोंडा यांच्या मिश्रणामुळे, मातीला पांढरट रंग आलेला दिसून येतो. त्यामुळे अशा प्रकारच्या प्राचीन टेकड्यांना पांढरी असे संबोधण्यात येऊ लागले. गावातील पांढरी ही आपल्या पूर्वजांच्या वस्तीची जागा आहे याची आठवण अद्यापि लोकांच्या मनात कायम आहे असे दिसते. "गावात पांढरीवर दिवा लावण्यास माणूस उरला नाही" असा एक वाक्प्रचार मराठीत आहे. त्यावरून पांढरीचा पूर्वजांशी संबंध जोडता येतो. तसेच या वाक्प्रचारावरून पूर्वी बहुधा पांढरीवर दिवा लावण्याची प्रथा असावी असे अनुमान काढता येते. आजही प्राचीन स्थळाच्या शोधार्थ महाराष्ट्रात कुठल्याही गावी गेल्यास गावातील पांढरीची चौकशी पुरातत्त्वाच्या अभ्यासकाने प्रथम करावी. बहुधा प्रत्येक गावात एखादी पांढरी असतेच. अर्थात ती ताम्रपाषाणयुगीन आहे किंवा शातवाहनकालीन वा मोगल-मराठा काळातील आहे हे ठरविण्याचे काम पुरातत्त्वज्ञाचे आहे.

गावातील पांढरी अनेक वेळा दुरूनही ओळखता येते. पांढरीवर उगवलेल्या गवताचा आणि झाडझाडोऱ्याचा आणि पांढरीच्या आसपास इतरत्र उगवलेली झुडपे यांच्या रंगातील फरक सहज ध्यानात येण्यासारखा असतो. पांढरीवर उगवणारे गवत आणि इतर झुडपे यांना पांढरीच्या मातीत वनस्पतींना पोषक अशी द्रव्ये नसल्यामुळे झुडपांची वाढ खुंटते. तसेच त्यांचा रंगही हिरवाकंच नसून थोडा पिवळसर असतो. या उलट पांढरीच्या आसपास इतरत्र उगविणारी झाडे-झुडपे हिरवीगार आणि टवटवीत दिसतात. पांढरीच्या आत जिथे दगडी किंवा विटांचे बांधकाम जेथे असेल तेथे वनस्पती उगवत नाहीत. त्यामुळे भिंतीच्या दोन्ही बाजूस गवत उगवलेले असल्यास भिंतीचा आलेख स्पष्ट नजरेत भरतो. अर्थात विमानातून घेतलेल्या छायाचित्राच्या साहाय्याने अशा प्रकारचे प्राचीन बांधकाम शोधून काढणे अधिक सुकर होते.

**हवाई छायाचित्रण**

प्राचीन स्थळांचा शोध लावण्याचे कामी हल्ली पाश्चात्त्य देशांत हवाई छायाचित्रणाचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. एकोणिसाव्या शतकात शत्रूच्या ठाण्यांचा सुगावा लागावा, म्हणून विमानातून छायाचित्रे घेतली जात असत. या तंत्राचा उपयोग प्राचीन स्थळांची छायाचित्रे घेण्यासाठी करावा असे सर चार्ल्स क्लोज या भारतातील एका ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्याने १८९१ मध्ये सुचविले. ताजमहालाची आणि तेथून जवळ असलेल्या फत्तेपूर शिक्री येथील प्राचीन वास्तूंची छायाचित्रे घेतल्यास प्राचीन अवशेषांचे अनेकविध पैलू केवळ छायाचित्रांमुळे आपल्याला कसे शोधून काढता येतात हे त्याने पटवून दिले. परंतु त्यात त्याला यश आले नाही. त्यानंतर कालांतराने युरोपमध्ये प्राचीन स्थळांची छायाचित्रे घेण्यास सुरुवात झाली.

प्राचीन स्थळाचे वा वास्तूंचे जे वैशिष्ट्यपूर्ण पैलू भूपृष्ठावरून पाहणी करणाऱ्या पुरातत्त्वज्ञाच्या सहसा लक्षात येणार नाहीत ते हवाई छायाचित्रात सहज दिसून येतात. युरोपात अनेक प्राचीन वास्तु, रोमन काळातील रस्ते इत्यादींचा शोध केवळ हवाई छायाचित्रांमुळे लावला गेला आहे. हवाई छायाचित्रे घेण्यासाठी पूर्वी हैड्रोजनवायूने भरलेला प्रचंड मोठा फुगा वापरीत. परंतु अलीकडे हेलिकॉप्टरचा आणि विमानांचा या कामासाठी उपयोग केला जातो. ज्या प्रदेशाची छायाचित्रे घ्यावयाची असतील तो प्रथम नकाशावर निश्चित करून सोयीसाठी त्याचे अनेक विभाग पाडले जातात. त्यातील प्रत्येक विभागाचे स्वतंत्र



Scanned with OKEN Scanner

LATUR

छायाचित्र घेतल्यामुळे संपूर्ण प्रदेशातील प्राचीन स्थळांचा अभ्यास करता येतो. काही वेळा प्राचीन अवशेषांची तिरकी छायाचित्रे घेतल्यास छायाप्रकाशामुळे त्यांची अधिक वैशिष्ट्ये ध्यानात येतात.

हवाई छायाचित्रे घेण्यासाठी वर्षातील काही ठरावीक काळच सोयीचा आहे. आपल्याकडे पावसाळ्यात हे काम कधीच करता येणार नाही. उन्हाळ्यात वावटळीमुळे धुळ उडून स्पष्ट छायाचित्रे घेणे अनेक वेळा अशक्य होते. त्यामुळे भरपूर प्रकाश आणि निरभ्र आकाश असेल त्या वेळी हवाई छायाचित्रे घेणे श्रेयस्कर आहे. त्यासाठी आपल्याकडे नोव्हेंबर महिन्यात दिवाळीनंतरचा काळ या कामासाठी अधिक सोयीचा आहे. त्या वेळी स्वच्छ आकाश आणि भरपूर उजेड तर असतोच, परंतु पावसाळा संपला असल्यामुळे सर्वत्र गवत आणि झाडे झुडुपे उगवलेली असतात. प्राचीन स्थळावरील वनस्पती आणि इतरत्र उगवणाऱ्या वनस्पती यांच्या रंगातील फरकाचा उल्लेख यापूर्वी केला आहे. त्यामुळे हवाई छायाचित्रात नव्याने उगवलेल्या वनस्पतींमुळे प्राचीन स्थळे शोधून काढण्यास उपयोग होतो. ही छायाचित्रे शक्यतो सकाळी किंवा संध्याकाळी घ्यावीत त्यातूनही सकाळची वेळ अधिक उपयुक्त ठरते. त्या वेळी उजेड सर्वत्र असतोच, परंतु दंव पडलेले असल्यामुळे प्राचीन वास्तूच्या आसपासचे गवत आणि वास्तूवर उगवलेले गवत यांच्यातील फरक लक्षात येतो.

हवाई छायाचित्रांची अर्थनिष्पत्ती (interpretation) करणे हे सोपे काम नाही; त्यासाठी तज्ज्ञांची जरुरी असते. हवाई छायाचित्रात दिसणारे प्राचीन वास्तूंचे अवशेष, रस्ते, कबरी इत्यादी ओळखण्यासाठी छायाचित्रांचा अभ्यास करण्याचे एक विशिष्ट तंत्र आहे. चित्रात क्वचित कोठे दगाची सावली पडली असेल तर सामान्य माणसाला ते सहसा ओळखता येणार नाही. तसेच ज्या प्रदेशातील चित्रांचा अभ्यास करावयाचा असेल तेथील पुरातत्त्वाचे आणि वास्तुशिल्पाचे समग्र ज्ञान असणे आवश्यक आहे. काही वेळा हवाई छायाचित्रात अवशेष दिसतही नाहीत. न्युबियामधील काही अवशेष तेथील छायाचित्रात आढळले नव्हते; परंतु प्रत्यक्षात मात्र ते सापडले. तसेच ज्या प्रदेशात मोठाली झाडे नि दाट जंगल आहे तेथील छायाचित्रे प्राचीन स्थळांच्या शोधासाठी सहसा उपयुक्त ठरत नाहीत. त्यामुळे हवाई छायाचित्रे घेण्यापूर्वी त्या प्रदेशाच्या संपूर्ण भौगोलिक रचनेचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक आहे.

## प्रतिरोध सर्वेक्षण

प्राचीन स्थळांच्या शोधासाठी अलीकडे काही शास्त्रीय पद्धतींचा यशस्वीत्या अवलंब करण्यात आला आहे. प्रतिरोध सर्वेक्षण (Resistence Survey) ही एक अत्यंत उपयुक्त अशी शास्त्रीय पद्धत आहे. तसे पाहिल्यास या पद्धतीमागील तत्त्व समजून घेण्यास फारसे अवघड नाही. पाऊस पडून गेल्यानंतर प्राचीन अवशेषांच्या वर असलेल्या मातीच्या थरात पाणी जिरते. जिथे खड्डा किंवा अन्य ठिकाणी पाणी साचून राहणे शक्य असते, तेथील भाग ओलसर असतो. यावरून ज्या ठिकाणी प्राचीन बांधकाम किंवा तत्सम अवशेष असतील तेथे पाण्याचा निचरा होऊन तो भाग कोरडा राहतो. पाणी हे विद्युत्वाहक आहे. तेव्हा प्राचीन स्थळातील ओलसर भागातून विद्युत्वहनाला मात्र प्रतिरोध निर्माण होतो. याचाच अर्थ ज्या ठिकाणी जमिनीत प्राचीन वास्तूंचे अवशेष असतील तेथे विद्युत्वहनाला प्रतिरोध निर्माण होणे शक्य आहे. परंतु ज्या ठिकाणी खड्डे आणि इतर प्रकारचा खोलगट भाग असेल तर तेथे मात्र विद्युत्वहनाला अडथळा निर्माण होणार नाही. या शास्त्रीय तत्त्वावर 'प्रतिरोध सर्वेक्षण' ही पद्धत आधारित आहे.



Scanned with OKEN Scanner

या पद्धतीनुसार प्राचीन वास्तू आणि इतर तत्सम अवशेष शोधून काढण्यास मदत होते. प्राचीन स्थळांचा शोध लावल्यानंतर एखाद्या स्थळी उत्खनन करण्यापूर्वी तेथील वास्तुशिल्पांचे अवशेष नेमके कोठे आहेत हे समजले तर उत्खननकाला पैसा आणि वेळ यांचा अपव्यय टाळता येईल. त्यामुळे प्रतिरोध सर्वेक्षणाचे महत्त्व निराळे सांगणे नको. या पद्धतीनुसार एखाद्या स्थळाची तपासणी करण्यासाठी पाच इलेक्ट्रोडस् आणि खूप लांबच लांब विजेची तार लागते. ज्या स्थळाची तपासणी करावयाची असेल तेथे तिवईवर रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसवून दोन इलेक्ट्रोडस् थोड्या अंतरावर सरळ रेषेत जमिनीत रोवले जातात. त्यांच्यामध्ये सारख्या अंतरावर आणखी दोन इलेक्ट्रोडस् रोवतात. कडेचे दोन्ही इलेक्ट्रोडस् विजेचा दाब मोजण्याकरता असतात, आणि मधले दोन प्रतिरोध (Resistence) मापनासाठी असतात. पाचवा इलेक्ट्रोड थोडा दूर रोवला जातो. जे सर्व विजेच्या तारेने रोहित्राला (ट्रान्सफॉर्मरला) जोडले जातात. इलेक्ट्रोडस्मधून वीज सोडल्यानंतर जमिनीखाली खोलगट भागातील ओलसरपणामुळे विजेला अडथळा निर्माण होत नाही. या प्रकारे विजेला जे कमी-जास्त प्रमाणात प्रतिरोध निर्माण होतो त्याचा आलेख काढण्यास जमिनीखाली प्राचीन वास्तूंचे अवशेष कोठे आहेत हे शोधून काढता येते. याप्रमाणे प्राचीन स्थळांच्या निरनिराळ्या भागात इलेक्ट्रोडस् आणि ट्रान्सफॉर्मरच्या साहाय्याने जेथे जेथे बांधकामाचे अवशेष असतील तेथे उत्खनन करण्यास सोयीचे ठरते. त्यामुळे अर्थातच वेळ आणि श्रम वाया जात नाहीत. या पद्धतीनुसार एका तासात सुमारे तीनशे नोंदी घेता येतात. इटलीमध्ये एट्रस्कन लोकांच्या अनेक कबरी या पद्धतीनुसार शोधून काढण्यात आल्या आहेत.

एखाद्या प्राचीन स्थळी जर दगड-गोटे पसरलेले असतील तर तेथे ही पद्धत फारशी उपयुक्त ठरत नाही. तसेच जमिनीखाली असलेल्या खड्ड्यात जर राडेरोडे असतील किंवा एखाद्या ठिकाणी जळून गेलेला भाग असेल तर तेथेही या पद्धतीचा अवलंब करण्यात अर्थ नाही.

**चुंबकीय सर्वेक्षण (Magnetic Prospecting)**

ही पद्धत प्राचीन वास्तू आणि इतर अवशेषांमुळे घडून येणाऱ्या जमिनीच्या चुंबकीय क्षेत्रातील बदलांवर आधारलेली आहे. काही प्राचीन अवशेषांत चुंबकत्व असते. माती भाजल्यावर तिला चुंबकत्व प्राप्त होते आणि ते नंतरही टिकून राहते. मातीमध्ये मॅग्नेटाईट आणि हेमॅटाईट या स्वरूपात लोहभस्मे (Iron oxides) असतात. त्यांच्यामुळेच भाजल्यानंतर मातीचा रंग तांबडा होतो. त्यांचे चुंबकीय क्षेत्र (magnetic field) हे जमिनीच्या चुंबकीय दिशेत असते. त्यामुळे जमिनीतील चुंबकीय क्षेत्रात थोड्याफार प्रमाणात बदल घडून येतो. त्याची तीव्रता मॅग्नेटोमीटरच्या साहाय्याने मोजता येते. एखाद्या प्राचीन स्थळाच्या निरनिराळ्या भागांतील चुंबकीय बदलाचे मोजमाप अशा रीतीने केल्यास तेथे जमिनीखाली प्राचीन भट्टी, चुली आणि इतर जळके अवशेष नेमके कोठे आहेत हे अचूक शोधून काढता येते. तसेच ते अवशेष जमिनीत किती खोलवर आहेत तेही समजते. चुंबकीय तीव्रतेच्या मापनात बांधकामाचा किंवा इतर अवशेषांचा मध्यबिंदू हा तेथे चुंबकत्वात घडून आलेल्या उत्तरेला असतो. त्या दोहोंमधील अंतर हे त्या अवशेषांच्या जमिनीवरील खोलीच्या एक तृतीयांश असते तसेच त्या प्राचीन अवशेषांच्या लांबी-रुंदी संबंधीही अनुमान करता येते. यावरून ही पद्धत किती अचूक आहे याची कल्पना येते.

या चुंबकत्व मापनाच्या पद्धतीसाठी अलीकडे प्रोटोन मॅग्नेटोमीटर हे उपकरण वापरले जाते. त्यामुळे या पद्धतीची उपयुक्तता अधिकच वाढली आहे. साधा मॅग्नेटोमीटर हा चुंबकत्व मापनासाठी जमिनीला बरोबर समांतर ठेवावा लागतो. परन्तु प्रोटोन मॅग्नेटोमीटर असा समांतर ठेवला नाही तरी

अनुक्रमणिका

Scanned with OKEN Scanner

LATUR

चालतो. तथापि हे उपकरण अत्यंत महागडे आहे. तसेच ते अत्यंत संवेदनाक्षम असल्याने हल्ली जमिनीखाली असलेले पाण्याचे नळ आणि विजेच्या तारा यांमुळे त्याच्या कार्यात चुका होऊ शकतात.

**मॅक्-कलो मोटर संशोधन**

प्राचीन स्थळांचा सर्वेक्षणाद्वारे शोध लावल्यानंतर एखाद्या ठिकाणी कोणत्या प्रकारचे अवशेष जमिनीत आहेत हे शोधून काढण्यासाठी थोड्या भागात गिरमिटाच्या साहाय्याने खोलवर नलिका खोदून आतील निरनिराळे थर आणि त्यातील अवशेषांचे नमुने वर काढता येतात. मॅक्-कलो गिरमिट हे स्वयंचलित असून त्याचे वजन फक्त चाळीस किलो असल्यामुळे ते कोठेही नेण्यास सुलभ असते. या गिरमिटाच्या द्वारे सुमारे बारा सेंटिमीटर व्यासाचे आणि चाळीस सेंटिमीटर खोलीचे छिद्र जमिनीत पाडता येते. या गिरमिटाचा उपयोग पाश्चात्य देशांत अलीकडे यशस्वीरित्या करण्यात आला आहे.

**लेरिसी परिदर्शक (Periscope)**

प्रतिरोध सर्वेक्षण आणि चुंबकीय सर्वेक्षण केल्याने जमिनीतील प्राचीन वास्तूंचा कसा शोध लावता येतो हे वर सांगितले आहे. जमिनीखाली बांधकाम केलेल्या कबरी अनेक ठिकाणी सापडतात. या थडग्यांत नेमके कोणत्या प्रकारचे अवशेष आहेत याचे कुतूहल पुरातत्त्वज्ञाला असणे स्वाभाविक आहे. या प्रकारच्या कबरीतील अवशेषांचे त्यांचे उत्खनन करण्याआधी छायाचित्रे घेण्याचे एक अभिनव उपकरण डॉ. कार्लो लेरिसी यांनी शोधून काढले आहे. थडग्याला मॅक्-कलो स्वयंचलित गिरमिटाने छिद्र पाडून त्यातून आत परिदर्शक (Periscope) सोडून त्याच्याद्वारे कबरीतील अवशेषांची छायाचित्रे घेता येतात व त्यांचा अभ्यास उत्खननापूर्वी करता येतो. लेरिसी यांचे उपकरण म्हणजे सुमारे तीन ते पाच मीटर लांबीची एक नळी असून तिच्या खालच्या बाजूस प्रकाश पाडण्याची व्यवस्था केलेली असते व तिच्या वरच्या बाजूचा उपयोग अवशेष पाहण्यासाठी आणि त्यांची छायाचित्रे घेण्यासाठी होतो. या उपकरणाच्या द्वारे प्रत्येक छायाचित्रानंतर परिदर्शक तीस अंशाने फिरविता येतो. त्यामुळे बारा छायाचित्रांत संपूर्ण कबरीच्या आतील भागांचा अभ्यास करता येतो. डॉ. लेरिसी यांनी या उपकरणाद्वारे शेकडो एट्रस्कन कबरीतील (इ.स.पू. ७ वे ते ३ रे शतक) अवशेषांची छायाचित्रे घेतली आहेत व त्यातील अवशेषांची नोंद केलेली आहे. या उपकरणाचा उपयोग आळंदी येथील ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या आतील भागाची छायाचित्रे घेण्यासाठी करावा अशी काही विद्वानांनी सूचना केली होती. त्यासाठी हे उपकरण देण्याची डॉ. लेरिसी यांनीही तयारीही दर्शविली होती. परंतु भाविकांच्या भावना त्यामुळे दुखावल्या जातील म्हणून या उपकरणाचा उपयोग केला गेला नाही.

**फोटोग्रामेट्री**

आपण नेहमी जी छायाचित्रे घेतो आणि पाहतो त्यात द्विमिती असते. त्यामुळे प्राचीन वस्तूंची आणि इतर अवशेषांची लांबीरुंदी फक्त आपल्याला समजू शकते. फोटोग्रामेट्री पद्धतीची छायाचित्रे मात्र त्रिमितीची असतात. ती स्टिरिओस्कोपिक असून फोटो-थिओडोलाईटच्या साहाय्याने घेतली जातात. या प्रकारच्या छायाचित्रात प्रत्येक अवशेषाची लांबी रुंदी आणि खोली स्पष्ट दिसत असल्याने प्रत्यक्ष वास्तूच आपण पाहत आहोत असा भास होतो. भौगोलिक नकाशे तयार करण्याच्या कामी ही पद्धत गेली चाळीस वर्षे उपयोगात आणली जात आहे. तसे पाहिल्यास १८५० मध्ये या पद्धतीने एका प्राचीन वास्तूची छायाचित्रे घेतली गेली होती. या पद्धतीचा पुरातत्त्वविद्येसाठी मोठ्या प्रमाणावर वापर व्हावा म्हणून युनेस्कोच्या



Scanned with OKEN Scanner

मदतीने इजिप्तमध्ये फोटोग्रामेट्रीचे एक केंद्र १९५५ मध्ये स्थापण्यात आले आहे. या केंद्राने अत्यंत मोलाची कामगिरी बजावली आहे.

## पुरातत्त्वीय नमुना-चाचणी (Archaeological Sampling)

एखाद्या प्राचीन स्थळाचा शोध लागल्यानंतर तेथे कोणत्या प्रकारचे अवशेष असतील याची नमुना-चाचणी पद्धतीने पाहणी करण्याचे एक अभिनव तंत्र अलिकडे अमेरिकन पुरातत्त्वज्ञांनी उपयोगात आणले आहे. एखादा विशिष्ट प्रदेशाचे सर्वेक्षण केल्यानंतर जी काही प्राचीन स्थळे सापडतात त्यांपैकी केवळ एखादद्दुसऱ्या ठिकाणी उत्खनन करणे शक्य असते. इतर काही स्थळे महत्त्वाची असूनही पैसा आणि वेळ यांच्या अभावी तेथे उत्खनन करता येत नाही. अशा महत्त्वपूर्ण स्थळांची केवळ त्यांच्या पृष्ठभागावर विखुरलेल्या अवशेषांची नमुना-चाचणी पद्धतीने तपासणी करून या स्थळांचे पुरातत्त्वीय महत्त्व जाणून घेता येते.

ही नमुना-चाचणी पद्धत पुरातत्त्वविद्येच्या कामी नव्याने उपयोगात आणलेली असली तरी संख्याशास्त्रात कित्येक वर्षे तिचा उपयोग केला जात आहे. त्यामुळे अर्थातच तिचे संख्याशास्त्रातील गुणदोष आहेत तेच राहतात. पुरातत्त्वविद्येच्या अभ्यासासाठी नमुना-चाचणी पद्धतीनुसार असे गृहीत धरले जाते की एखाद्या प्राचीन स्थळाच्या पृष्ठभागावर असणारे अवशेष हे त्यांच्या मूळ ठिकाणाहून फारसे दूर विखुरलेले नसतात. त्यामुळे ते उत्खननात जसे सापडले असते जवळजवळ तसेच पृष्ठभागावरही असतात. या पद्धतीनुसार ज्या प्राचीन स्थळाची पाहणी करावयाची तेथे उत्खननासाठी ज्या रीतीने आपण खड्ड्यांची आखणी करतो तशी करतात (आकृती १). त्या स्थळाच्या संपूर्ण पृष्ठभागावर सर्वसाधारणपणे पाच मीटर लांबी-रुंदीच्या किंवा स्थळ फार मोठे असल्यास दहा मीटर लांबी रुंदीचे चौरस खड्डे आखून घेतात. यासाठी संपूर्ण खड्डे न आखता फक्त त्यांच्या चार खुंट्या ठोकतात. एकूण चौकोनांपैकी फक्त दहा टक्के चौकोनांची चाचणी पद्धतीने पाहणी करण्याचा संकेत संख्याशास्त्रानुसार रूढ आहे; परंतु नेमके कोणते चौकोन निवडावयाचे हे संख्याशास्त्रावरील ग्रंथात दिलेल्या तालिकेवरून ठरवावयाचे असते. त्याप्रमाणे जे चौकोन पाहणासाठी निवडले जातात त्यांच्या चारी खुंट्यांना दोरी बांधतात. अशा प्रकारच्या प्रत्येक चौकोनातील पृष्ठभागावर असलेली प्रत्येक वस्तू, दगड, खापरे, विटांचे तुकडे, दगडी हत्यारे आणि मानवी संस्कृतीचे इतर कोणतेही अवशेष गोळा करावे लागतात. या अवशेषांचा अभ्यास केल्यानंतर त्या प्राचीन स्थळी कोणत्या भागात कशा प्रकारची वस्ती होती यासंबंधी अनुमान बांधता येते, असे या पद्धतीचा पुरस्कार करणाऱ्या पुरातत्त्वज्ञांचे मत आहे. उदा., एखाद्या चौकोनात फार थोडी खापरे आणि गारांची हत्यारे आणि गाभे (cores), ती ज्यापासून तयार केली त्यांचे दगड-गोटे इत्यादी अवशेष सापडल्यास त्या ठिकाणी गारांची हत्यारे तयार केली जात होती असे म्हणता येईल. दुसऱ्या ठिकाणी काही तांब्याच्या वस्तू, तांबटाची हत्यारे, त्याची मूस इत्यादी अवशेष सापडल्यास तेथे तांबटाचे घर होते असे अनुमान काढता येईल. जेथे बांधकाम असेल तेथे अर्थातच विटांचे तुकडे आणि दगडगोटे प्रामुख्याने सापडतील. सकृद्दर्शनी हे कसे शक्य आहे अशी शंका मनात येणे स्वाभाविक आहे; परंतु अशा प्रकारच्या नमुना-चाचणी पद्धतीने ज्या स्थळांची पाहणी झाली आहे त्यांच्या पुराव्यावरून अशा प्रकारचे अनुमान करता येणे शक्य आहे असे दिसून येते.

ही पद्धत पुरातत्त्वविद्येसाठी सर्वप्रथम प्रा. बिनफर्ड यांनी उपयोजिली. अमेरिकेच्या इलिनॉय राज्यातील हॅचरी वेस्ट या गावी असलेल्या प्रागैतिहासिक स्थळाचे अन्वेषण (exploration) त्यांनी या



LATUR

Scanned with OKEN Scanner

LATUR

पद्धतीने केले. भूपृष्ठावर विखुरलेले सांस्कृतिक अवशेष जमिनीतील त्यांच्या मूळ स्थानापासून फारसे दूर जात नाहीत असे या पद्धतीनुसार गृहीत धरले जात. यासाठी प्रा. बिनफर्ड यांनी हॅचरी वेस्ट येथील प्रागैतिहासिक स्थळ प्रथम एका शेतकऱ्याकडून नांगरून घेतले. यामुळे जमिनीखाली एक फूट खोलीवर असलेले अवशेष वर आले. ते नमुना चाचणी (Sampling) पद्धतीने गोळा करून त्यांचा अभ्यास प्रा. बिनफर्ड यांनी केला. तसेच तेथे त्यांनी उत्खननही केले त्यावरून ही पद्धत पुरातत्त्वविद्येसाठी प्राचीन स्थळांचे अन्वेषण करण्यास अत्यंत उपयुक्त आहे हे त्यांनी दाखवून दिले.




आकृती १ – नमुना-चाचणी पद्धतीची आखणी

या प्रकारच्या नमुना-चाचणी पद्धतीने पाहणी केलेले अत्युत्तम उदाहरण म्हणजे तुर्कस्तानातील चायोनू हे होय. तेथे १९६४ साली लहान प्रमाणावर उत्खनन झाले होते. त्यातील पुराव्यावरून तेथील सर्वप्रथम वसाहत नऊ हजार वर्षांइतकी प्राचीन होती हे सिद्ध झाले आणि म्हणून तेथे नमुना-चाचणी पद्धत किती प्रमाणावर यशस्वी होते हे ठरविण्यासाठी डॉ. चार्ल्स रेडमन् आणि पॅटी ज्यो वॅटसन् यांनी त्यांची पाहणी केली. वर सांगितल्याप्रमाणे या स्थळाची त्यांनी ५x५ मी. च्या चौकोनात विभागणी करून त्यातील दहा टक्के चौकोनातील एकूण एक अवशेष गोळा केले. तेथे सापडलेल्या अवशेषांचा अभ्यास करून कोणत्या ठिकाणी कोणत्या प्रकारचे अवशेष किती प्रमाणात सापडतात याची तपशीलवार माहिती त्यांना मिळाली. त्याचप्रमाणे विशिष्ट अवशेषांच्या, म्हणजे खापरे, दगडी हत्यारे आणि इतर अवशेष यांच्या व्याप्तीचे आलेख काढले. भूगोलात अशा प्रकारचे व्याप्तीचे आलेख काढण्याची पद्धत फार पूर्वीपासून आहे. हीच पद्धत पुरातत्त्वज्ञांनी येथे उपयोगात आणली. त्यावरून असे दिसून आले की त्या स्थळाच्या ईशान्येकडील भागात त्यांना इतर ठिकाणांपेक्षा फार मोठ्या प्रमाणावर खापरे सापडली. तसेच नैऋत्येकडील भागात गारांची हत्यारे (microliths), गारा व गाभे (cores) फार मोठ्या प्रमाणावर सापडले. शिवाय तेथे एकही खापर सापडले नाही हे लक्षणीय आहे. अशा प्रकारे अवशेषांची व्याप्ती कोठे कशी होती याचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी ह्या स्थळाच्या ईशान्य आणि नैऋत्य भागांतील चौकोनात उत्खननही केले. त्यांना उत्खननात मिळालेला पुरावाही पृष्ठभागावर सापडलेल्या अवशेषांचा उपोद्बलक होता हे अगत्याचे सांगितले पाहिजे. यावरून स्थळाच्या पृष्ठभागावर विखुरलेले अवशेष हे सर्वसाधारणपणे आपल्या मूळच्या ठिकाणावरून फार दूरवर पसरलेले नसून तेथेच जवळपास असतात असे म्हणता येईल.



Scanned with OKEN Scanner

या प्रकारची पुरातत्त्वीय चाचणी-पद्धत भारतात गुजरातमध्ये भावनगर जिल्ह्यातील सिंधु संस्कृतीच्या स्थळांच्या पाहणीसाठी पेनसिल्व्हानिया विद्यापीठाचे डॉ. ग्रेगरी पोसल यांनी वापरली होती. तसेच खुद्द लेखकानेही डॉ. पोसल यांच्या साहाय्याने पुण्याजवळील वाळकी या प्रागैतिहासिक स्थळाची पाहणी या पद्धतीने केली.

## सागरी पुरातत्त्व (Underwater Archaeology)

समुद्रांतर्गत सर्वेक्षण करण्याची पद्धत आता पाश्चात्य देशांत मोठ्या प्रमाणावर यशस्वी होत आहे. प्राचीन काळी ग्रीस, रोम, इजिप्त, पर्शिया इत्यादी देशांचा एकमेकांशी समुद्रमार्गे मोठ्या प्रमाणावर व्यापार होता, हे इतिहासाच्या विद्यार्थ्यांना नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. निर्यात केलेला माल भरून जी जहाजे समुद्रातून जात असत ती अनेक वेळा वादळात सापडून किंवा चाच्यांच्या हल्ल्यांमुळे समुद्रात बुडत असत. त्याच्याबरोबर अर्थातच त्यातील मौल्यवान वस्तूही समुद्राच्या पोटात गडप होत. अतिप्राचीन काळापासून ते मध्ययुगापर्यंत शेकडो जहाजे समुद्राच्या तळाशी गेली. या जहाजातील प्राचीन अवशेष समुद्रात जेथे दडलेले असतील त्या ठिकाणांचा शोध लावून ते अवशेष वर काढण्यास आता मोठ्या प्रमाणावर सुरुवात झाली आहे. यालाच सागरी पुरातत्त्व (Underwater Archaeology) अशी संज्ञा आहे.

या प्रकारे समुद्रात संशोधन करण्यास या शतकाच्या सुरुवातीस सुरुवात झाली. त्याचे श्रेय एका ग्रीक खलाशाला द्यावे लागेल. इ.स. १९०० मध्ये क्रीट बेटावर एक नावाडी त्याची बोट वादळात सापडल्यामुळे समुद्राच्या किनाऱ्यावर बसला होता. तेथे वेळ जाईना म्हणून तो समुद्रात खोलवर बुड्या मारत होता. अशीच एक बुडी खूप खोलवर मारून तो खाली गेला, तेव्हा त्याच्या हाताला एक वस्तू लागली. ती त्याने वर आणून पाहिल्यानंतर तो एक प्राचीन ग्रीक मद्यकुंभ (amphora) होता असे त्याला आढळून आले. यातूनच पुढे समुद्रान्तर्गत सर्वेक्षणास सुरुवात झाली.

प्राचीन काळी जहाजे बुडाल्याचे उल्लेख वाङ्मयात आणि कोरीव लेखात जेथे आढळतील तेथून ते गोळा करून त्याची जंत्री पुरातत्त्वज्ञ करतात. सर्वसाधारणपणे जहाज कोठे बुडले असेल आणि त्यावरून ते समुद्रात नेमके कोठे दडले असेल यासंबंधी आडाखे बांधले जातात. एजिअन, आयोनियन आणि भूमध्य समुद्रात अशा प्रकारची शेकडो जहाजे पूर्वी समुद्रात बुडाली. त्यामुळे तेथे या प्रकारचे संशोधन जारी आहे. या पद्धतीने सर्वेक्षण करून शोधून काढलेले आतापर्यंतचे अत्यंत महत्त्वपूर्ण अवशेष महदिया या ट्युनिशियाच्या पूर्वकिनाऱ्यावर असलेल्या समुद्रात सापडले. १९०७ साली काही ग्रीक पाणबुड्यांनी तेथे समुद्रातून प्राचीन अवशेष काढले होते. पुढे १९१३ साली तेथून आणखी काही अवशेष काढण्यात आले. त्यात ग्रीक वास्तुशिल्पाचे अवशेष, मातीची भांडी, संगमरवरी पुतळे आणि ब्रॉन्झच्या अनेक मूर्ती सापडल्या. त्या सर्व इ. स.पू. पहिल्या शतकातील होत्या. ल्यूशस कॉर्नेलियस सल्ला या रोमन हुकुमशहाने इ.स.पू. ८६ मध्ये अथेन्स शहर जिंकून ते संपूर्णपणे लुटले आणि तेथील काही अवशेष त्याने जहाजात भरून रोमला पाठविले. हे जहाज पुढे वादळात सापडून समुद्रात बुडाले. १९४८ मध्ये त्या ठिकाणाहून आणखी अवशेष काढण्यात आले. अशा प्रकारे समुद्रान्तर्गत संशोधन युरोपात आता अनेक ठिकाणी केले जाते.

अनुक्रमणिका.

Scanned with OKEN Scanner

LATUR

## संदर्भ ग्रंथ

1. Sir Mortimer Wheeler, *Archoeology from the Earth*, (Oxford, 1964).
2. O. G. S. Crawford , *Archaeology in the Field*, (London, 1965).
3. R. J. C. Atkinson, *Field Archaeology* (London, 1953, revised edn).

## अनुक्रमणिका

Scanned with OKEN Scanner

MANJARA CHARITABLE TRUST'S

SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

Project Work / Field Work

## Certificate

This is to certify that,

Mr./Mrs. Madake Bhagwan, Darkash Vikas, Chavan Astha Dakore.

has successfully completed the Project Work/ Field Work entitled Prachin sthyalancha shodh

Conducted by the Department of History in the academic year 2022-23.

Project Guide

Dr. Kamble B.N.
Head of the Department

Scanned with OKEN Scanner

MANJARA CHARITABLE TRUST'S

SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

DEPARTMENT OF HISTORY

Project work /Field Work

(2022-2023)

# INDEX

| Sr.NO | Content |
|---|---|
| 1. | Introduction -objectives & outcomes |
| 2. | Notice |
| 3. | Students List (With Project Guide) |
| 4. | Distribution of Topic |
| 5. | Project Work on<br>1) Gandhar Kala Shaili ani Mathura Kala shaili<br>2) Ashma Yugin Manavi Jivan<br>3) Prachin Sthyalancha Shodh<br>4) Jal Vyavasthapan<br>5) Marathwada Mukti Sangramatil Aarya Samajache Yogdan |
| 6. | Summary Report |
| 7. | Certificate |

Scanned with OKEN Scanner

# Introduction –Objectives & Outcomes

## 1) Gandhar Kala Shaili ani Mathura kala Shaili

LATUR

### Objectives:

- To Give Knowledge About Greek and Indian Scriptures Art and Skill
- To Spread Ancient Spiritual And religious views
- To Increase Interest in Architecture and Archeological Sector

### Outcomes:

- Students can Explore and Gain more knowledge in ancient Art
- Student Can Put Their Views on religious and Spiritual Factor

## 2) Ashma Yugin Manavi Jivan

### Objectives:

- To Get Knowledge About Stages of Human evolution
- To Get Idea About Social Construction In Ancient times
- To Get Knowledge About Art and Communication System in Stone Age

### Outcomes:

- Students Get Value of Hard Work
- Students Get Inspiration of Development and Inspiration
- Student can Get Motivation from Struggling Lifestyles of Stone Age

## 3) Prachin Sthyalancha Shodh

### Objectives:

- To Explore stages Of Human Development
- To Explore Various Aspect of Human Life
- To review the geographical Positions in Human Life

### Outcomes:

- Students Can Build Better Society by Correcting Errors from Ancient Society
- Students Can Get Interest in Archeological Sector
- Students Develop Sense of Conservation of Ancient Sites

Scanned with OKEN Scanner

## 4) Jal Vyavasthapan

LATUR

### Objectives: –

- To Get Knowledge About Water Irrigation system
- To get Importance of Water in our Daily Life
- Water Irrigation system Importance in Period of Chhatrapati Shivaji Maharaj

### Outcomes:

- Students learnt to Proper Use Of water irrigation system
- Student Get Idea About Wastage Of water
- Students Find Way to Minimize Water Wastage

## 5) Marathwada Mukti Sangramatil Aarya Samajache Yogdan

### Objectives: –

- To Get Knowledge About Political Condition and Views in Pre and Post Independence period
- To Get Aspects About Education, Society construction By Aarya Samaj
- To get Aspect About Development of New ideology in India

### Outcomes:

- Students Are Inspired to Fight against Injustice and Violation
- Independence, Equality, Fraternity, Patriotism is Developing in students Mind

एक विसावे शतक बदल आणि तंत्रज्ञानाचे आहे हे आपण स्वीकारले देखील आहे पण याबद्दल आणि तंत्रज्ञानाच्या दसारीपाटाच्या डावा प्रगती आणि विकास हे दोन मोहरे खेळवता खेळवतात एक महत्त्वाचा ज्याला जीवन असे संबोधले जाते ते पाणी नावाचा राजाच आपण असा काही गायब केलाय की तो आता शोधून सापडणार नाही जीवनामध्ये पंचतत्वांना आधार मानण्यात आला आहे त्यातील एक म्हणजे पाणी आपण पावसाला आणि पर्यायाने पावसाच्या पाण्याला पर्जन्य राजा असे म्हणतो त्याची राणी आहेस रस्ते म्हणजे आपली पृथ्वी जर पाणी या भूतलावर नसतं तर ही सुंदरसृष्टी निर्माण झालीच नसती पाण्याशिवाय आयुष्य ही कल्पनाच करू शकत नाही पाण्याचा अन्य साधारण महत्व यावरून लक्षात येते की जगभरात लोकसंख्या वसाहती या प्रामुख्याने नदीच्या किनारी प्रस्थापित झालेल्या पाहायला मिळतात आणि त्या ठिकाणाहूनच मानवाचा विकास स्वतः आला आहे असंख्य नगर शहर ही नदीच्या काठीच उभी राहिलेली पहावयास मिळतात

पाणी हा प्रत्येक भारतीयांचा हक्क आहे असा निवाडा सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेतील 21 व्या कलमानुसार जगण्याच्या हक्काचा आधार दिला आहे पाण्याची समस्या दिवसेंदिवस बिकट होत आहे अशा परिस्थितीत पाण्याचा हक्क प्रत्येकाला मिळवून देणे हे सरकार साठी कठीण झाले आहे पाणी प्रश्नावर मात करावयाचे असेल तर त्यासाठी न्यायालयाने काही निर्देश दिले आहेत त्यात प्रामुख्याने विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची कास धरणे हे त्यात नमूद केलेले आहे त्याचे काटेकोर पालन व्हायला आहे जसे जसे तंत्रज्ञान विकसित होत गेले मानवी वस्त्या तेथे नदी नाही त्या भागात निर्माण झाले चेरी भागात वाढते शहरीकरण औद्योगिकीकरणामुळे आणि वाढत्या स्थलांतरामुळे तर सततच्या दुष्काळाने विहिरी नद्या नाले आटल्याने ग्रामीण भागात पाणी प्रश्न आज गंभीर झालेला आहे या सर्व गोष्टीमुळे आपल्याला आज राज्यातच नव्हे तर देश आणि जागतिक पातळीवर ठिकठिकाणी संघर्ष तंटे पाहायला मिळत आहेत.

दरवर्षी प्रजन्यमान घटल्याने पाणी कमी कमी होत आहे खासदार जमीन नापीक होत चालली आहे परिणामी शेतकरी उध्वस्त झाला आहे शेतकरी आत्महत्या करत आहे त्यामुळे शेतीप्रधान देशाची अर्थव्यवस्था कोलवंडी आहे रोज ऐकण्यात आणि वाचणार असे पहावयास मिळते की जलसंधारण आणि जल व्यवस्थापन याचे

Scanned with OKEN Scanner

महत्व आपल्याला समजलेच नाही हे प्रकर्षाने जाणवते पाणीटंचाई फक्त भारतात किंवा महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही तर जागतिक पातळीवर अनेक शहर देश या संकटाला सामोरे जात असतात असे दिसत आहे दरवर्षी आणि दहा वर्षांनी ओला किंवा सुका दुष्काळ त्याच्यासोबत आपण लढा देतोय त्यासाठी कठोर पावले उचलण्याची आज वेळ आलेली आहे नाहीतर पाणी म्हणजे जीवन नो वाटर नो लाईफ जेल है तो कल या घोषणा काहीच अर्थ उरणार नाही

हवा अण्णा कपडे घर व पाणी या मूलभूत गरजा आहेत हे आपण जाणतो हवे नंतर पाणी हे जीवन राहण्यासाठी महत्त्वाचा घटक आहे तरीदेखील पाणी कोठे गेले पाणी कोणी सोडले असे प्रश्न नेहमीच आपल्याला कानावर पडतात मानवी उपयुक्त पाणी असणारा सूर्य मालिकेतला पृथ्वी हा एकच घटक आहे त्याचा 71 टक्के भाग पाणी असून त्यातील 29 टक्के भाग जमिनीचा आहे त्यात 71 टक्के पाण्यात 98 टक्के पाणी हे खारे आहे फक्त दोन टक्के पाणी पिण्यायोग्य उपलब्ध आहे दोन टक्क्यांमधील फक्त एक टक्का पाणी नदी तलाव जल स्तोत्राद्वारे आपल्याला मिळते प्रत्येक वेळी पाणी वाटपाचा हा दुर्दैवी खेळ सर्वांना माहीत असूनही त्याकडे होणारे दुर्लक्ष हेच कळीचा मुद्दा आहे आपल्याला पाणी बंद बाटलीमध्ये भेटतो म्हणून नदीचे दुःख आपल्याला समजत नाही हे दुर्दैव आहे वेळ आहे ती नदी पुनर्जीवित करण्याची आणि योग्य जलनीतीची त्याद्वारे जल आराखडा तयार करून त्याला योग्य व्यवस्था नफा चे स्वरूप द्यावयाचा आणि प्रत्येक भारतीय ना पाणी हक्क त्याच्यापर्यंत पोहोचवायचा

जागतिक संशोधन संस्थेनुसार भारतात 17 देशांना अति गंभीर पाणी संकटाला सामोरे जावे लागणार असून उपलब्ध पाण्यासह भूगर्भातील पाण्याच्या बेसुमार वापरामुळे देखील जलसाठे कोरडे पडू शकतात असा इशाराही संस्थेने दिला आहे या यादीत भारतीराव्या क्रमांकावर आहे जल शेती व पाण्याच्या झोपण्याची संबंधित जागतिक संशोधन संस्थेने पाण्याची गंभीर समस्या दुष्काळ आणि पूर परिस्थिती पाण्याच्या दृष्टीने जोखमीच्या असलेल्या 189 देशाच्या क्रमांकावर यादीचा अहवाल तयार केला आहे अति गंभीर जल संकटामुळे चेन्नईकडे जगाचे लक्ष वेधले गेले आहे भारतातील विविध भागात पाण्याची गंभीर समस्या आहे भारतासह इतर 17 देशात शेती उद्योग नगरपालिका उपलब्ध पाण्यापेक्षा 80 टक्के पाणी फक्त जास्त उपयोगात आणतात याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज या संस्थेने स्पष्ट केलेले आहे

आदर्श पाणी व्यवस्थापन या विषयावर भारत नीति आयोगातून लक्ष ठेवण्यात आले आहे की नीती आयोगाच्या निर्देशानुसार गुजरातने 75 टक्के गुण मिळवत प्रथम तर 56% गुणासह महाराष्ट्र नव्या क्रमांकावर आहे देशाची राजधानी दिल्ली 20% मिळवत शेवटच्या स्थानी आहे नीती आयोगाने अहवालातून एक प्रकारचे धोक्याचा इशारा दिलेला आहे मान्सून भारताला वरदान लाभलेला आहे भारतासारख्या देशात पाणीटंचाईची वेळ ही नही गोष्ट चिंताजनक आहे पाण्याच्या बाबतीत सम्राट असणाऱ्या पहिल्या दहा देशात भारत आहे

Scanned with OKEN Scanner

LATUR

पृथ्वीवरच्या विनायोग्य पाण्यापैकी भारतात चार टक्के पाणी आहे पण जगाच्या लोकसंख्येच्या 17 टक्के लोकसंख्या आपली आहे त्यामुळे इंटर गव्हर्मेंटल पॅनल ऑफ क्लाइमेट चेंज यांच्या आधारानुसार भारतात दरडोई उपलब्ध पाण्याचा वापर आंतरराष्ट्रीय मानांकनाच्या पेक्षाही खूप कमी आहे अन्नधान्य उत्पादनात देशाचा वरचा क्रमांक असला तरी धान्य पिकवायला इतर देशांना जितकं पाणी लागतं त्यामुळे तिप्पट पाणी भारतामध्ये वापरला जातो त्यावरून सिंचन पद्धत आणि शेतीसाठी पाणी वापर यावर चिंतन होणार खूप गरजेचे आहे.

महाराष्ट्राच्या दुष्काळाची इतिहासात विचार केला असता लक्षात येईल की 1952 ते 2015 पर्यंत मराठवाड्याने 1972 साले सर्वोत्तम सर्वात मोठा दुष्काळ अनुभवला आहे परंतु त्यावेळेस किंतीही वेगळी होती त्यावेळी जमिनीत पाणी होते पण अन्नधान्याचा तुटवडा होता सध्या स्थिती यांच्याबरोबर विरोधी आहे आज आपल्याकडे मुबलक प्रमाणात अन्नधान्य आहे परंतु पाण्याच्या बनवा अजूनही याच्याकडे दुर्लक्ष केले तर काय होईल याच विदारक चित्रण सांगितलेलं बरं आपण 2003 सा*** जलनीतीचे कायदेशीर रुपांतरित केलं याचा फायदा असाच झाला की कोणत्या भागात किती पाणी लागणार याच चौक नियोजन होते त्याद्वारे दर पाच-दहा वर्षांनी त्याचा पाठपुरावा होऊन गरज जमिनीपर्यंत पाणी गेलं पाहिजे याचा हेतू हाच होता पण कालांतराने आपण धोरण बदलली स्वातंत्र्यानंतर आपण जय जवान जय किसान हा नारा देत शेतकरी समृद्ध करत देश सुजलाम सुफलाम करण्याचा मानस जोरदार आखला होता पण गेल्या चार ते पाच वर्षात पंचवार्षिक योजना सोडल्या आणि जननी तेवर किंवा पाण्यावर काम करणे बंद झाले तेथून आपला कुठेतरी विकासदर आणि त्याची गती मंदावलेली पाहायला मिळते कारण आपण सुरुवातीला गोदावरी खोरे कृष्णा खोरे नर्मदा खोरे यमुना आणि कावेरी खोरे हे मोठमोठे धरण बांधले जलसाठा वाढवला त्यातून 30 टक्के 40 टक्के येट जमीन ओलिताखाली आली पण त्यानंतर आपण 80 टक्के गावात पिण्याचे पाणी देखील देऊ शकलो नाही त्याचं कारण आपण धरणापासून गावापर्यंत आणण्याची सोय केली नाही यावर देखील आज विचार करण्याची गरज भासत आहे संयुक्त महाराष्ट्राच्या आधारानुसार जगभरात एक आमचे लोक हे मूलभूत पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत पाण्यासाठी वनवून फिरत आहे जगभरात महिलांचे प्रतिदिवशी 200 दशलक्ष तास खर्च होतात जगभरात दहा देशांमध्ये मिळून 60 टक्के लोक आजही शुद्ध पाण्यापासून वंचित आहेत त्यातील 90 टक्के लोक भारतात राहतात हे दुर्दैव आहे त्याची कारणे देखील संयुक्त राष्ट्राच्या अहवालामध्ये नमूद केलेली पाहायला मिळतात त्यात वंश आणि लिंगभेद भाषा जात जन्मस्थळ त्याचप्रमाणे आर्थिक आणि सामाजिक विषमता हे प्रमुख कारण आहे संयुक्त महाराष्ट्राने हे देखील स्पष्ट केले की पर्यावरणीय बदल निसर्गाचा ऱ्हास वाढती लोकसंख्या स्थलांतर त्यामुळे सर्व देशांना पाणीटंचाई सोसावी लागत आहे भारत

Scanned with OKEN Scanner

देश देखील याला अपवाद नाही म्हणूनच जल व्यवस्थापनाचे कठोर उपाय योजना करणे गरजेचे आहे राज्य देश आणि जागतिक पातळीवर याची अंमलबजावणी करण्याची गरज आहे

दक्षिण आफ्रिकेची राजधानी शहर केप टाऊन हे पहिले आधुनिक शहर आहे जे आज पाण्यापासून उंची झाले आहे भारताची श्रीकांत व्हॅली म्हणून ओळखले जाणारे बंगलोर शहर भारतातील 21 अशा शहरांपैकी एक आहे ज्यांना भविष्यात प्रचंड पाणी टंचाईला समोर जावे लागणार आहे शहर मेक्सिको देशाची मेक्सिको शहर अफगाणिस्तानात काबुल शहर चीनमधील बैजिंग शहर हे आणि जगातील इतर अनेक शहरे आज पाण्यासाठी झुंजताना झगडताना दिसत आहेत बार्शी लोन आहे स्पेनच्या काटा लोणी या प्रांताची राजधानी व स्पेनमधील दुसरे सर्वात मोठे शहर तेथे सुद्धा फ्रान्स मधून पाण्याचे टँकर आणावे लागत आहेत आपण सावधानतेचा इशारा समजला नाही तर ही वेळ आपल्यावर देखील येऊ शकते या सर्व शहरांमध्ये एक समान धागा दिसतो तो म्हणजे नैसर्गिक पाणी स्त्रोत होते ते नष्ट करून इमारती बांधल्या गेल्या आणि दुऱ्या पाणी स्वत:वर अवलंबून राहिले कालांतराने हे स्तोत्र देखील संपतात आल्याने जवळपास शंभर दशलक्ष लोकांच्या मानेवर पाणी प्रश्नाची टांगती तलवार सदैव फिरत आहे सर्वाधिक पाणीटंचाई हे मध्य आशिया उत्तर आफ्रिका भारत पाकिस्तान मध्ये पाहावयास मिळतील भारत चीन दक्षिण आफ्रिका ऑस्ट्रेलिया आणि संयुक्त राष्ट्र यांना देखील भीषण पाणी टंचाईला समोर जावं लागत आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्राने खूप वर्षापासून जगाला पाणी संकट येणार आहे यासाठी पाण्याची गरज आणि त्याचा पुरवठा यामध्ये तफावत होईल हे सांगितले होते 1977 साले संयुक्त राष्ट्रांनी पाणी परिषद घेतली होती तिथून चालू झालेली त्यांची पाणी चळवळ अजूनही कार्यरत आहे 2005 ते 2015 हे आंतरराष्ट्रीय दशक त्यांनी पाणी जीवनासाठी म्हणून घोषित केले होते याद्वारे विकसनशील देशात एक पॉईंट तीन अब्ज लोकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळाले त्यांनी 2030 पर्यंत शाश्वत विकास आणि पाण्याची उपलब्धता पाहिजे म्हणून विषय पत्रिका केलेली होती त्यानुसार त्यावर संयुक्त राष्ट्र संघाने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

सुमारे 25 वर्षांपूर्वी जल व्यवस्थापन जन नियोजन जलसाक्षरता हे शब्द सुद्धा आपल्याकडे म्हणजेच जर माणसाकडे प्रचारात नव्हते परंतु एकविसाव्या शतकात सुरुवातीला पाणी समस्येपासून झालेली आहेत अनेक पंडितांनी पाण्यावरून महायुद्ध होतील असे भाकीत वर ठेवलेले आहे त्यातील तथ्य आणि सत्य आज कळू लागले आहे आज आपण विचार केला तर लक्षात येईल की जल व्यवस्थापन कशासाठी करायचो तर ते शिवारातील वाळवंट रोखण्यासाठी शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी तहानेने व्याकुळलेल्या मराठवाड्याला विदर्भासह सर्वच दुष्काळी भागाला तहान भागवण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध असताना आणि अवर्षण काळात या दोन्ही परिस्थितीतील नैसर्गिक रित्या उपलब्ध पाणी विविध मार्गाने येणारे पाणी प्राधान्य क्रमानुसार शेती उद्योग व्यवसायासाठी जल निर्मितीसाठी घरगुती वापरासाठी पाणी वाटप

LATUR

Scanned with OKEN Scanner

करण्याची गरज जल व्यवस्थापनाची गरज आहे आपण इतका पाणी उपसा केला आहे की पुढच्या पिढीला काय देणार आहोत याचा विचार आणि याचे उत्तर आज शोधून ठेवणे काळाची गरज आहे मग आपण जल व्यवस्थापन नको का करायला.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन**

जेव्हा आपण जल व्यवस्थापनासाठी अनेक उपाय शोधू लागतात तेव्हा आठवण येते ती छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि त्यांची जल व्यवस्थापनाची नीती

छत्रपती शिवाजी महाराजांनी गड किल्ल्याच्या आश्रयाने स्वराज्य उभे राहिले म्हणून डोंगर माथ्यावरील किल्ल्यावर प्रथम प्राधान्य पिण्याच्या पाण्याला एका आज्ञापत्रातील दुर्ग प्रकरणामधील गडाची राखण याविषयी महाराज म्हणतात तसेच गडावर आधी उदक पाहून किल्ला बांधावा पाणी नाही आणि तेथे स्थळ ते आवश्यक बांधणे प्राप्त झाले तरी आधी खडक फोडून तळी टाकी प्रजन्य काळापर्यंत संपूर्ण काळात पाणी पुरेल अशी मजबूत बांधावी गडावर झराही आहे जसे तसे पाणी पुरते म्हणून तइटवपवरच निश्चिती ना मानावी उद्योग करावा की निमित्त की झुंजामध्ये भांडीयाचे आवाजाखाली झरे स्वल्प होतात आणि पाणियाचा खर्च विशेष, तेव्हा संकट पडते.याकरीता तसे जागी जखिरियाचे पाणी म्हणून दोन तीन टाकी तळी बांधावी.त्यातिल पाणी खर्च होऊ न द्यावे गडाचे पाणी बहुत जतन राखावे गड व पाण्याच्या देखभालीसाठी त्यांनी म्हटले आहे की लोहार सुतार पायरवट यांना गड पाहून एक एक दोन दोन असामान्य करून ठेवाव्यात लहान सहान गडावर त्याचे नित्य काम पडते असे नाही याकरता त्यांचे कामाचे हत्यारे त्यांच्याजवळ तयार असावे गडावरील शिबंदीला वर्षभर पाणी कशी पुरेल याची नियोजन त्यांनी आपल्या दृष्टिकोनाने करून ठेवलेले होते.

छत्रपती शिवरायांच्या जल व्यवस्थापनाचे महत्त्व आपण जेव्हा 350 वर्षानंतर आजही कोणत्याही गड किल्ल्यावर गेलो तरी तेथे पाणी दिसते यावरून समजते स्वराज्याची राजधानी रायगड येथील जल व्यवस्थापन तर खास अभ्यासासाठी आहे रायगडावरील लेणी व डोंगराच्या पोटात खोदलेले खा टाकी पाहिल्यानंतर लक्षात येते की रायगड हा प्राचीन गड आहे छत्रपती शिवाजी महाराजांनी आज्ञापत्रात म्हटले आहे की गडावर घराचे पाणी भरपूर आहे म्हणून त्यावर विसंबून न राहता एक-दोन तळी अधिक बांधून राखीव ठेवावी प्रसंगी ती कामास येतील हे रोप पाहून त्यांच्यापुढे पिण्याच्या पाण्याचे नियोजन लक्षात घेऊन व निसर्ग चक्राप्रमाणे पाण्याचे नियोजन करणे किती गरजेचे आणि महत्त्वाचे आहे हे आपल्याला पहावयास मिळते

जलाचे प्रमाण त्याचे उपयुक्त व उपभोगीता म्हणजे प्रत्यक्ष वापरण्याच्या शास्त्रीय दृष्टीय अभ्यास करून ते योग्य प्रमाणात उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने केलेली व्यवस्थापन तरतूद उपायोजना म्हणजे जल व्यवस्थापन होय.देशातिल पाऊस पूर्वीपासून लहरी आहे.गेल्या 10-15 वर्षात त्याचा लहरी पणा अधिक वाढला

LATUR

Scanned with OKEN Scanner

आहे.त्यामुळे जल धोरण आणि जल व्यवस्थापनात बदल करण्याची वेळ आली आहे.कृषि व सिंचन पद्धत बदलावी लागत आहे.आधुनिक तंत्रज्ञान वापरून पावर व्यापक संशोधन आणि उपाय शोधणे गरजेचे आहे अतिवृष्टी आणि दुष्काळ ही अस्मानी संकटावर मात करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन बदलण्याची गरज आहे पर्यावरणीय जल व्यवस्थापन जल व्यवस्थापनाचे मुख्य प्रकार पाण्याबरोबरच पाण्यावर प्रक्रिया करणारे धरणातील गाळ उपसा करणारे जल प्रदूषण कमी करणारे हे देखील तेवढेच महत्त्वाचे आहे पर्यावरणीय जल व्यवस्थापन करत असताना निसर्गाची जोपासना करणे परिसरात वनीकरण म्हणजे विभाज्य आहे वाढत्या मानवी हस्तक्षेपामुळे नद्यांचे आरोग्य बिघडले आहे त्याचे वाईट परिणाम मानवी जीवनावर होत आहे त्याचबरोबर शेती आणि बागायती त्याच्यावर त्याचा परिणाम होत आहे शेती आणि बागायती सिंचन पिण्याच्या पाण्यावर होत आहे प्रजन्यमान लहरी होण्यामागे हे देखील महत्त्वाचे कारण आहे नद्याच्या जलसिंचन क्षेत्रात सातत्याने बेसुमार वृक्षतोड चालू आहे आणि त्यातून मातीची प्रचंड धूप होत असल्याने जमिनीत पाणी मिळण्याचे प्रमाण खूप कमी होत चालले आहे सार ते शेवटी निसर्गाची श्रीमंती हीच आपली श्रीमंती आहे निसर्गाला गरीब करून आपण श्रीमंत होण्याचे स्वप्न हे फक्त स्वप्नच राहील नद्या आणि त्याचा मुगखोरी पाणलोट क्षेत्र आशा पातळ्यावर नैसर्गिक भौगोलिक रचना सिंचन कार्यक्रमाचे काम करताना नदी खोरे उपखोरे यांना भौगोलिक मर्यादित अडकून टाकण्यापेक्षा कामकाजाच्या प्रशासकीय पातळीवर निर्माण केल्या तर त्याचा फायदा

आपल्या शाश्वत विकासाबद्दलची जागतिक दूरदृष्टी आणि ध्येय ही जरी महत्त्वाकांक्षी वाटत असली तरी जोपर्यंत त्यामध्ये आपण सक्रिय सहभाग घेणार नाही तोपर्यंत ती प्राप्त होणार नाही आपण जर निसर्गाचे निरीक्षण केले तर एक अंदाज येईल की पाणी जास्त आपल्यापासून दूर गेले नाही पण जे जवळ आहे ते फार दूषित झालेले आहे नदी प्रदूषण त्याचप्रमाणे इतर पाणी साठ हे प्रदूषित झालेले आहे जल व्यवस्थापनाचा गाभा आहे कारण पाच वर्ष वयाखालील जवळपास ८०० पेक्षा अधिक बालके पाण्यातून उद्भवणाऱ्या आजारामुळे मृत्युमुखी पडतात हे विधान स्थिती आज आपल्याला पाहायला मिळ

नील नील जल व्यवस्थापन म्हणजे जल संकलन आणि साठवून संपूर्ण भारताचा विचार केल्यास आपल्याला असे लक्षात येईल की ८० टक्के पाण्याचे पावसाचे पाणी आपण आणू शकत नाही महाराष्ट्रातील एकट्या कोकणातून पडणाऱ्या पावसाच्या ९० ते ९५ टक्के पाणी समुद्राला जाऊन मिळते त्याची साठवणूक करणे गरजेचे आहे पाणी अडवता ना अडवता येण्याला कारणे भरपूर आहेत पण यावर देखील उपाय व्हायला पाहिजे कारण पाऊस हि अडचण नाही तर अडचणी आहे ती शास्त्रीय पद्धतीने पाणी साठवण्याची सोय आपल्याकडे नाही पावसाच्या पाण्याचे संवर्धन आणि साठवणूक ही सर्वात सोपी पद्धत आहे दुष्काळी भागाला पाणीपुरवठा करण्यासाठी निर्जल व्यवस्थापन मोठा पर्याय आहे सह्याद्रीच्या घाटमाथावरून जल

Scanned with OKEN Scanner

बोगदे काढून दुष्काळी भागात नदी खोऱ्यामध्ये पावसाचे पाणी वळवणे परंतु गुंतवणूक अधिक असली तरी भविष्याचा विचार केल्यास महत्त्वपूर्ण उपाय आहे आणि योग्य नियोजनातून हे प्रकल्प पूर्ण होतील ज्या ठिकाणी दरवर्षी दुष्काळ येतो तेथे उपाय योजना करून देखील दुष्काळ काही केल्या आठवत नाही हे राज्याशी संपूर्ण देशाचा वास्तव आहे याचं कारण असं आहे की भूगर्भाची आवक कमी आणि जावक मोठ्या प्रमाणावर आहे म्हणजे उदाहरणार्थ पगार हजार रुपये आणि खर्च बाराशे रुपये मग दिवाळखोरी ठरलेली असते याचे भान देखील ठेवणे गरजेचे आहे कारण आपण सतत घेतच राहिलो तर कुबेराची धनसंपत्ती देखील संपती हे वास्तव आपण स्वीकारला तयार नाही उपलब्ध पाणीसाठा आणि गरज यांचं गणित मांडताना आपण विचार केला पाहिजे तसेच वेळ आहे की माथा ते पायथा वृद्ध संवर्धन करण्याची दरवर्षी शंभर टक्के भूजल साठा होत नाही जलसाठा वाढवण्यासाठी आपण जलसंवर्धनाच्या नावाखाली पुढे उतरतो त्यातून सर्व वाळू वाहून गेली आणि तोटा असा झाला की जमिनीचा भूस्तर पूर्णपणे बंद पडले कारण वाळू ही जमिनीची चाळणीची काम करते आणि वाढवण्याचे महत्त्वपूर्ण भूमिका ती बजावत असते आज असंख्य गावांमध्ये शंभर पेक्षा अधिक बोरवेल्स आहेत आणि आठ ते दहा हून जास्त सिंचन विणलेली असताना पाण्याची टंचाई नित्यनेमाप्रमाणे वाढतच आहे यावरून स्पष्ट होते की कुबेराकडे किती धन असले तरी त्यांना मर्यादा प्रत्येक घरावरचे पावसाचे पाणी जर आपण जमिनीत जिरवले तर जमिनीतला पाणीसाठा वाढत जाईल

समन्यायी जल व्यवस्थापन म्हणजे प्रत्येकाला पाण्याचा मूलभूत हक्क मिळवून देणे कोणत्याही क्षेत्राला किती पाणी लागते त्याचा आढावा घेणे कोणाला किती आणि कसे ते पाणी मिळेल आणि पाण्याचा हक्क प्राधान्य क्रमाने कुणाचा आहे आणि त्याला पाणी मिळते का याचा शोध घेणे या सर्व बाबी यामध्ये समाविष्ट होतात पाण्याचा मूलभूत हक्क लोकांना मिळवून द्यायचा असेल तर कोणत्या क्षेत्राला किती पाण्याची आवश्यकता आहे त्याचा प्रथम आढावा घ्यावा लागेल कोणाला किती कधी आणि कसे पाणी मिळेल आणि पाण्याचा हक्क प्राधान्याने कोणाचा आहे आणि प्राधान्य क्रमाने पाणी मिळते का याचा शोध घ्यायचा घ्यावा लागेल पाणी उपलब्ध करून द्यायचे आणि समन्यायी पद्धतीने पाणी वाटपाची प्रक्रिया सातत्याने सुरू ठेवावी लागेल

समय पाणी वाटप लक्षात घेऊन 2005 स*** जननीतीमध्ये दोन कायदे तयार करण्यात आले त्यातून शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी जाईल याकडे लक्ष दिले गेले पण पुढील सहा वर्षे यावर कारवाई झाली दिसत नाही 2011 स*** जलनीतीमध्ये आणखी बदल करून पिण्याचे पाणी शेतीसाठी पाणी आणि औद्योगिक कारखान्यासाठी पाणी ही क्रमवारी ठरवण्यात आली अलीकडच्या काळात जलप्रकल्प हे पिण्याच्या पाण्याचे टांग आणि साठवणुकीचे केंद्र होत चाललेले आपल्याला पाहायला मिळतात त्यामुळे सर्वांना त्यांचा हक्क मिळवून देण्यावर आणि पाणी वाटपावर गदा येत आहे खरंतर बळीराजाचा पाण्यावर पहिला अधिकार आहे

LATUR

Scanned with OKEN Scanner

पाण्याची टंचाई वासू नये आणि लागवडीच्या क्षेत्राला पाणी कमी पडू नये यासाठी पाण्याचे नैसर्गिक भौगोलिक असे सर्व कशी विचार करून पाणी उपलब्धतेसाठी अधिक योग्य आणि प्रसंगी जलनीती आखणी आणि अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

पिकनिक आहे जल व्यवस्थापन आज खूप महत्त्वाचा झाला आहे कारण म्हणजे आज आपण 21व्या शतकात असताना एकूण सव्वा शतकातील सिंचन व्यवस्था वापरतो आहोत पीकनिहाय जल व्यवस्थापन म्हणजे कोणत्या पिकाला किती पाणी लागते त्याचप्रमाणे पाणी देण्याच्या पद्धती शोधून काढणे पीक पद्धतीत बदल जमिनीच्या प्रकारानुसार आणि उपलब्ध पाण्यानुसार पिकाची रचना मिश्र पीक लागवडीला प्राधान्य देणे या गोष्टी करणे हितकारक आहे कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांसमवेत जास्त पैसा देणारी पिके निवडावे शेवटी आपण जमिनीला दिलेल्या पाण्याच्या मोबदल्यात मिळणार उत्पन्न देखील तितकेच महत्त्वाचे आहे आज पारंपारिक पीक पद्धतीत बदल करून आधुनिक तंत्रज्ञान उपयोगात आणणे काळाची गरज आहे ठिबक आणि तुषार सिंचन वापरताना भविष्यात जे पीक लागवड करावयाची आहे त्याची तयारी करून सिंचन पद्धत निवडले तर आर्थिक व्यंजना होणार नाही दुष्काळग्रस्त मराठवाड्यात सर्वात जास्त साखर कारखाने आहेत आणि मागील वर्षी अजून 40 कारखान्यांना मान्यता देण्यात आलेली आहे हा मुद्दा विचारात घेणे अत्यंत गरजेचे आहे

आपण गहू बाजरी डाळी या पिकावरून सर्वात जास्त पाणी लागणाऱ्या उसाकडे तांदूळ शेतीकडे वळलो आणि पाण्यासाठी बघणं करून ठेवले एरवी पाच प्रमाणे पीक पद्धती अशी करावयाची की प्रत्येक थेंबातून पिकांना नव संजीवनी मिळाली पाहिजे. तामिळनाडूमधील शेतकऱ्यांना कमी पाण्यात येणाऱ्या पीक घेण्यासाठी प्रोत्साहित केले गेले जसे की डाळी बाजरी यासारखी पिकं बाजरीसाठी प्रति किलोमागे फक्त दोनशे ते तीनशे लिटर पाणी लागते तर भात शेतीसाठी आणि उसासाठी प्रति किलो 2000 ते 3000 लिटर पाणी लागते यासारख्या संकल्पना मनात ठेवून शेती करणे गरजेचे आहे

शेतकऱ्यांनी गट शेतीला प्राधान्य देऊन तीन ते चार किंवा पाच ते दहा असे शेतकरी एकत्र येऊन शेततळी उभी केली तर ती सिंचनाच्या दृष्टीने आर्थिक दृष्टीने शेतकऱ्यांना परवडणारे तर आहेत पण गरजेच्या वेळी पाणीसाठा उपलब्ध असेल आर्थिक संकटातून बाहेर येऊ पाहणाऱ्या शेतकऱ्यांना हा एक उत्तम पर्याय आहे असे म्हणता येईल

महाराष्ट्रात फक्त धरणे बांधून उपयोग नाही तर पहिल्या चार ते पाच पंचवार्षिक योजनांमध्ये मोठे मोठे धरण बांधली पण कालांतराने त्याचे रचनात्मक तपासणी झाली नाही त्यातील गाळ उपसा करण्यात आला नाही गाळ व जल व्यवस्थापन महत्त्वाची भूमिका पार पाडतात जमिनीचे सुपीकता वाढवतो ज्या जमिनीवर टाकण्यात आला आहे ते पाण्याची गरज कमी करते धरणाची पाणी साठवून क्षमता वाढते पर्यायाने

Scanned with OKEN Scanner

शेतकऱ्याचा आर्थिक विकास होतो मराठवाडा आणि विदर्भ उन्हाळ्यात दुष्काळात शेतकरी काम नसल्याने कसे तरी दिवस काढतात त्यांना सोबतीला घेऊन गाळ उपसा करता येईल धरणासंबंधी एक अडचण आहे की पाण्याचा प्रश्न केवळ जल व्यवस्था नापास निगडित नाही तर धरण बांधण्याची निगडित आहे धरणातून पाणी प्रश्न सोडवला जावा हा हेतो असतो पण पाणी प्रश्न जाणीवपूर्वक भौगोलिक गुंतवणूक करून पाणी वापरावर मर्यादा आणल्या जातात या मर्यादा राज्य आंतरराष्ट्रीय स्तरावर असतात भौगोलिक आधार देऊन पाण्यावर राजकारण झाल्याचे देखील पहावयास मिळते पायलीकडे जाऊन आपण मोठ्या धरणाच्या खाली व वरच्या आज बाजूस लहान लहान किती धरणे असावे याचा विचार करायला.

MANJARA CHARITABLE TRUST'S

SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

Project Work / Field Work

*Certificate*

This is to certify that,

Mr./Mrs. Devkte Khandu, Gaikwad Dhampale, Gaikwad, Pothtwar

has successfully completed the Project Work/ Field Work entitled

Jal Vyavasthapan.

Conducted by the Department of History in the academic year 2022-23.

Project Guide

Head of the Department

Scanned with OKEN Scanner

LATUR

श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय लातूर

शैक्षणिक वर्ष 2022-2023

इतिहास विभाग

प्रकल्प लेखन

प्रकल्पाचे शिर्षक

" अश्मयुगीन मानव जीवन "

मार्गदर्शक

डॉ.कांबळे बी.ए.

डॉ.विजयकुमार मेकेवाड

प्रकल्प लेखनकार

बी.ए.प्रथम वर्षाचे विद्यार्थी

1) मगर परमेश्वर काकासाहेब
2) गोमसले ओमकार विष्णु
3) कारागीर ओमकार अरविंद
4) रबपारखी अकास माणिक

Scanned with OKEN Scanner

# प्रकल्प लेखन

## अश्मयुगीन मानवी जीवन

### उद्दिष्टे

1)मानवी उत्क्रांतीच्या टप्प्याचे ज्ञान मिळवणे

2)प्राचीन काळातील मानवी जीवनाची माहिती प्राप्त करणे

3)पाषाण युगातील कला आणि स्थापत्य चे ज्ञान मिळवणे

### परिणाम/ निष्कर्ष

1)विद्यार्थ्यांना कष्टाच्या जनिवेतुन यश मिळवता येते

2)विद्यार्थ्यांना स्व विकासाची प्रेरणा मिळते

3)पाषाण युगातील मानवी संघर्षमय जीवन शैलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यां जगण्याची व कष्ट करण्याची प्रेरणा मिळते.

Scanned with OKEN Scanner

प्रकल्प लेखन

# अश्मयुगीन मानवी जीवन

Page No. : Date : / VEDIKA SATUR

**प्रस्तावना :-**

मानव हा लाखो वर्षापासून या पृथ्वी तलावर वास्तव्य करून आहे. मानवाला प्रगती करण्यासाठी अनेक घडामोडीतून वाटचाल करावी लागली. त्या घडामोडींचा वृत्तांत म्हणजे इतिहास होय. थोडक्यात भूतकाळात घडलेल्या महत्त्वाच्या घटनांचा वृत्तांत म्हणजे इतिहास होय. मानवाच्या इतिहासाची विभागणी प्रागैतिहासिक व ऐतिहासिक अशा दोन कालात करण्यात आली ज्या काळात मानवाला लेखनकला अवगत नव्हती त्या काळाला 'प्रागैतिहासिक काळ' किंवा इतिहासपूर्व काळ' असे म्हणतात. तर लेखन कलेचा प्रारंभ झाल्यानंतरच्या काळास ऐतिहासिक काळ' म्हटले जाते.

या पृथ्वीवर तलावर मानव थोड्यातरी लाख वर्षापूर्वी जन्माला आला असला तरी त्याला फक्त पाच हजार वर्षापूर्वी लेखनकला अवगत झाली. यावरूनच आपणास प्रागैतिहासिक काळ किती मोठा आहे याची कल्पना येते. या काळात अश्मयुग व ताम्रपाषाण युग यांचा समावेश होतो. अति प्राचीन काळात मानवाला अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवनाची वाटचाल करावी लागली. तत्कालीन काळात पृथ्वीतलावर विशाल व विचित्र प्राणी, घनदाट जंगले, उंच उंच पर्वत, मोठे मोठे जलाशय होते. या काळात मानवाने विविध प्रकारच्या आयुधांचा वापर केला.

## प्रागैतिहासिक काळाच्या इतिहासाची साधने :-

मानवाचे सांगाडे, प्राण्यांची हाडे व सांगाडे, दगडापासून तयार केलेली हत्यारे आणि उपकरणे, खापराचे तुकडे, लाकडी व हाडांची हत्यारे ही इतिहासपुर्व काळातील मानवी इतिहासाची साधने आहेत. इतिहासपुर्व काळातील मानवाच्या अस्तित्वाची माहिती आपल्याला त्याने बनविलेल्या दगडी हत्यारामुळे होते, त्यामुळे त्या युगाला 'अश्मयुग' असे म्हणतात. अश्मयुग जुने व नवे असे मानले जाते. इतिहासपुर्व काळातील अश्मयुगीन संस्कृतीचे अवशेष देशातील विभिन्न भागात मिळाले आहेत. रॉबर्ट ब्रुस फुट यांना मद्रासजवळील पल्लावरम या ठिकाणी एक अश्मयुगातील दगडी हत्यार इ.स. 1863 मध्ये मिळाले. गेल्या अनेक वर्षात देशात अश्मयुगीन संस्कृतीचे जे अवशेष मिळाले, त्यावरून अश्मयुगाचे पुढील प्रमाणे विभाग पाडता येतात.

1) पुर्वाश्मयुग 2) मध्याश्मयुग 3) उत्तराश्मयुग
4) नवाश्मयुग 5) धातुयुग (ताम्रपाषाण युग)

### 1) पुर्वाश्मयुग (जुने अश्मयुग) इ.स.पु 300,000 ते 50000 :-

या काळातील अवशेष देशातील अनेक नद्यांच्या खोऱ्यात सापडले आहेत. या युगातील मानवाची हत्यारे ओबड धोबड स्वरूपाची होती. या युगातील मानवाची अवस्था रानटी स्वरूपाची होती.

Scanned with OKEN Scanner

प्राण्यापासून आपला बचाव करण्यासाठी व प्राण्यांची शिकार करण्यासाठी मानवाने काळ्या बिल्लोरी दगडापासून (Quartzite) व लाकडे व प्राण्यांच्या हाडापासून तयार केलेली होती. ही हत्यारे आग्नेय आशि या व ही हत्यारे ओबडधोबड असली तरी टोकदार होती. पंजाब व काश्मीर या ठिकाणी जी हत्यारे सापडली आहेत त्यांना 'सोहन' संस्कृतीची हत्यारे म्हणतात. या हत्यारासारखीच सरळ व टोकदार हत्यारे आग्नेय आशिया व चीनमध्येही सापडली आहेत. अशी हत्यारे नदीकाठी सापडली असून जमिनीच्या ज्या थरात ती सापडली आहेत. त्याचा अभ्यास केला असता असे अनुमान काढता येते की काश्मीर व पंजाबात मानव हा सुमारे तीन लाख वर्षापूर्वी भटकत असावा. तो नदीकाठी मिळतात. या काळातील मानवास विस्तव व तो नदीकाठी वास्तव्य करून राहत असे. तत्कालीन मानवाचा वंश निश्चितपणे सांगता येत नाही. पुर्वाश्मयुगीन हत्यारे देशात महाराष्ट्र, म्हैसूर, आंध्रप्रदेश, मद्रास, गुजरात व मध्यप्रदेशात बहुतेक नदीकाठी मिळतात. या काळातील मानवास विस्तव व कुंभाराच्या चाकाची माहिती नव्हती. दगडी टोकदार हत्यारावरून आपणास या युगातील मानवाची माहिती होती.

LATUR



## 2) मध्याश्मयुग (इ.स.पू 50,000 ते 10,000 ):-

भारतात सर्वप्रथम मध्याश्मयुगीन हत्यारे अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे या ठिकाणी सापडली. या युगातील हत्यारे यानंतर देशात इतर काही भाग तही सापडली आहेत. मध्याश्मयुगीन हत्यारे पुराश्मयुगीन हत्यारापेक्षा आकाराने लहान व टोकदार आहेत. हत्यारे चर्ट जातीच्या दगडापासून तयार केली जात असून ती धारदार बनविली जात असत. त्याचप्रमाणे लहान छन्नी व टोकदार हत्यारे बनविली जात होती ही हत्यारे चाळीस हजार वर्षापूर्वीची प्राचीन असावी असे अनुमान काढला येते. या काळात रानटी बैल, घोडा, हरीण व हत्ती यासारखे प्राणी होते. या प्राण्यांची हाडे विविध नद्यांच्या काठी मिळाली आहेत. मानवाची हाडे सापडली नसल्यामुळे म्हणून तत्कालीन मानवाचा वंश निश्चित सांगणे कठीण आहे.

## 3) उत्तराश्मयुग (इ.स.पू 10,000 ते 3000) :-

उत्तराश्मयुगातील हत्यारांचा आकार लहान व धारदार बनवला गेला. या काळात हवामानात बदल होऊन हवा उष्ण व कोरडी बनली. व धारदार व पूर्वी अस्तित्वात असलेल्या अजस्त्र प्राण्यांची शिकार करण्यासाठी लहान हत्यारांची गरज मानवाला निर्माण झाली म्हणूनच हत्याराचा आकार लहान झाला. या काळात हत्यारे ही गारेच्या दगडा पासून (Chakedony) तयार केली जात असत

Scanned with OKEN Scanner

LATUR



ही हत्यारे बनविण्याची एक पद्धती होती. पहि त्यांना ज्या दगडी गोट्याचे लाकडी किंवा प्राण्या च्या हाडाच्या दांडक्याने लहान लहान छिलके काढून घेत असत. छिलके काढताना ठोका देण्यासाठी हातोड्यासारखा एक गोटा असे व त्याखाली येरणीसारखा एक दगड किंवा प्राण्या हाडाचीही वापर करीत असत. गुजरातमधील मध्याश्मयुगीन लोक गेंड्याच्या खांद्याच्या हाडाच उपयोग येरण म्हणून करीत असत. छिलके काढताना ठोका देण्यासाठी हातोड्या सारखा एक गोटा असे व त्या खाली येरणीसारखा एक दगड किंवा प्राण्यांच्या हाडांचाही वापर करीत असत. हत्यारे त्रिकोणी अर्धचंद्राकृती व चतु ष्कोणी असत. अशी हत्यारे ग्राण्याच्या लाकडी दांड्यात किंवा हाडाच्या पशुधन. हेच नवाश्मयुगी लोकांची मालमत्ता होय. बैल, शेळ्या, मेंढ्या व डुक्करे यांच्या साठी स्वतंत्र गोठे असत. गोठ तील शेणाचा ढिगारा रात्री जाळून टाकीत असत त्यामुळे पाळीव जनावरांचे व झोपड्यांचे हिंस्र पशुपासून आपोआपच संरक्षण होत असे

4) नवाश्मयुग (इ.स.पू. 2500 ते 1000):- या युगातील हत्यारे दगडांचीच असली तरी मानवाला अनुभवाने त्यामध्ये बऱ्याच सुधारणा करता आल्या. या काळात अग्निजन्य काळ्या दगडापासून (Trap Rock) हत्यारे बनविण्यात येऊ लागली. हत्यारे घासून गुळगुळीत चमकदार करण्यात येऊ लागली. नवाश्मयुगीन मानव झोपडी करून राहू लागल धान्य व फळांचे उत्पादन तो करू लागला.

मातीची भांडी तयार करण्यात सुरुवात झाली. मानवाची शिकारी अवस्था संपुष्टात येऊन तो शेतकरी अवस्थेत स्थिर झाला. याच काळात चाकाचा आणि अग्नीचा शोध लागला. त्यामुळे मानवाच्या जीवनात क्रांतिमय बदल झाला. चाक व बैलगाडीचे साधन ठरल्यामुळे मानव एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी दूर दूर जाऊ लागला. मानव सालीच्या व कातडीच्या वस्त्राबरोबरच लोकरी व कापसापासून कापड विणण्यास शिकला. त्यांच्या अंगावर कपडे दिसू लागली. मनोरंजनासाठी शिकार व सामुहिक नृत्याची कल्पना पुढे आली मानव चित्रे रंगवू लागला. त्यातूनच पुढे मानव कला कौशल्यामध्ये पारंगत झाला. गुहा, भिंती, मातीची भांडी व अनेकदा देहावरही मानव चित्रे रंगवू लागला. त्यातूनच पुढे चित्र-लिपीचा शोध लागला. अशा रितीने मानवाने प्रगती केली. त्याने झाडाच्या बुंध्यापासून नाव तयार केली व नद्यातून प्रवास करण्यात सुरुवात केली. मानवाच्या पृथ्वीतलावरील भूपृष्ठभागाच्या ज्ञानात वाढ झाली. मानवाला पृथ्वीचे आकर्षण निर्माण झाले. मेलेल्यांची स्मृती जतन करण्याची प्रबळ आकांक्षा निर्माण झाली. मृत व्यक्ती जिवंत होईल म्हणून मानव त्यांना थडग्यात पुरू लागला. काही वेळा शेजारतीही प्रेते ठेवलेली दिसून आली. यामधूनच मृतांची पूजा सुरू झाली. असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मानवाच्या जादूटोणा व भूत पिशाच्च यावर विश्वास वाढू लागला.

नवाश्मयुगाच्या उत्तरार्धात मानवाच्या धार्मिक कल्पनांचा उदय झाला.

सुरुवातीला नैसर्गिक शक्तींची भिती मानवाला वाटत होती. त्यामुळे या शक्तींना आपलेसे करून घेण्यासाठी मानवाने निसर्ग शक्तींची भक्ती करण्यास सुरुवात केली. अग्निदेवतेची व सूर्यदेवतेची पूजा करण्यात येऊ लागली. पण या काळात धार्मिक तत्वज्ञान निर्माण झाले नाही. भारतातील गोंड, भिल्ल, मुंड, नागा आणि संथाल इत्यादी लोक या युगातील वारस असावेत.

5) **धातुयुग :-**

नवाश्मयुगातील मानवाला फक्त सुवर्णाचे च ज्ञान होते. नवाश्मयुगानंतर धातुयुगात प्रारंभ झाला. अश्मयुगात मानवाने दगडीचीच हत्यारे वापरली होती. कालांतराने तांबे, कासे व लोखंड यांचा शोध लागला. जगात सर्वत्र ताम्रयुगानंतर ब्रांझयुग सुरु झाले. पण भारतात ताम्रयुगानंतर लोहयुगास सुरुवात झाली. याच युगात मानव सुती व लोकरीची वस्त्रे परिधान करू लागला. धातूपासून हत्यारे बनविली जाऊ लागली. याच युगात मानवाचा तुकड्यात डिंकाच्या साहाय्याने अगदी घट्ट बसविली जात असत. या हत्यारांचा उपयोग सुरीसारखा कापण्यासाठी व तुकडे करण्यासाठी होत असे. अशाप्रकारची संयुक्तपणे एकमेकांना चिकटवलेली हत्यारे भारतात मिळाली नाहीत. अशी हत्यारे डेन्मार्क व पॅलेस्टाईनमध्ये अद्यापि आहेत. अशी हत्यारे गवत कापण्यासाठी वापरतात.

LATUR

VEDHA
Page No. :
Date : / /

## अश्मयुगातील जीवन :-

### 1) सामाजिक जीवन :-

अश्मयुगीन मानवाच्या जीवनाची माहिती आपल्याला तत्कालीन दगडी हत्यारावरूनच घ्यावी लागते. प्रारंभीच्या काळात मानव हा लहान लहान कळप करून राहत असावा, त्यामुळेच सामुहिकरित्या प्राण्यांची शिकार करणे व संरक्षण करणे परस्पराच्या सहाय्याने मानवाला शक्य होत असे. मानव कळप करून राहत असल्यामुळे त्यांच्यात परस्परांबद्दल आपुलकीची भावना असावी असे दिसते. अशा रितीने मानव हा सुरुवातीच्या काळात देशातील विविध भागात टोळ्या करून राहत असावा. शिकार करणे व हत्यार तयार करणे ही पुरुषाची कामे होती व फळे व कंदमुळे गोळा करण्याचे काम स्त्रिया करीत असाव्यात असे दिसते. मानव हा भटकत असला तरी ऊन व पावसापासून संरक्षण होण्यासाठी तो शिलाश्रयाचा सहारा घेत होता. मध्यप्रदेशातील नर्मदेच्या खोऱ्यात मोठमोठी शिलाश्रये आढळून आली. नवाश्मयुगात मानव झोपडी करून राहू लागला, त्यामुळे त्याच्या जीवनात स्थैर्य प्राप्त झाले.

### 2) घरे :-

अश्मयुगातील मानवाने निवारा म्हणून गुहा शिलाश्रयाचा सहारा घेतला असावा असे दिसते. देशातील चंबळेच्या व नर्मदेच्या व कर्नाटकातील मलप्रभेच्या खोऱ्यातील गुहांचा सहारा मानवाने

Scanned with OKEN Scanner

LATUR



ऊन व पावसापासून बचावासाठी केला असावा. परंतु भारतातील हवामान उष्ण व दमट असे त्यामुळे मानव उघड्यावरच भटकत राहिला असा त्याची शक्यता नाकारता येत नाही.

नवाश्मयुगात मात्र मानव झोपडी करून एकाच ठिकाणी राहू लागला; तत्कालीन घराचे अवशेष काश्मीर व आंध्र प्रदेशात मिळाले आहेत. काश्मीरमधील लोक हवामान थंड असल्यामुळे जमिनीत घरे करून राहत होते. श्रीनगरच्या उत्तरेला बुर्झहोम येथे जमिनीत घरे सापडली आहेत. जमिनीतील खड्याची घरे गोलाकार होती. या खड्यावर छप्पर उभारले जात असे. खड्याच्या भिंती मातीने लिंपलेल्या असत. या घरात खापराचे तुकडे व हाडांची अवजारे आढळून आली. सुमार सोडून दोन घरे एकमेकांना जोडली जात असत. हत्यार, आयुध आणि अन्न अशा घरात सुरक्षित राहण्यासाठी ठेवली जात असत. इतर सर्व व्यवहार दिवसभर घराच्या बाहेर चालत असत. नवाश्मयुगीन दक्षिण भारतातील शेतकरी झोपडीत राहत असत. आंध्र प्रदेशातील ग्रॅनाईटच्या प्रचंड पत्थराचा उपयोग मानवाने निवारा म्हणून केला. घरात रांजणात धान्य साठवून ठेवत असत. घरे गोलाकार असून त्याला कुडाच्या भिंती असत. पशुधन हेच नवाश्मयुगीन लोकांची मालमत्ता होय. बैल, बोकड मेंढ्या व डुकरे यांच्यासाठी स्वतंत्र गोठे असत. गोठ्यातील शेणाचा ढिगारा रात्री जाळून टाकीत असत. त्यामुळे पाळीव जनावरांचे व झोपड्यांचे हिंस्र पशुपासून आपोआपच संरक्षण होत असे.

Scanned with OKEN Scanner

Page No. :
Date : / /

## ३) अन्न :-

अश्मयुगीन मानव भटक्या अवस्थेत राहत होता. तो प्राण्यांची शिकार करून त्याचे कच्चे मांस खात असावा. कंदमुळे व फळे यांचाही उपयोग अन्न म्हणून केला जात असावा. नंतरच्या काळात मात्र मानव प्राण्यांचे मांस भाजून खाऊ लागला. अश्मयुगीन भारतात उत्तरेतील सोहन नदीच्या खोऱ्यात जंगली हत्ती होते. तसेच मध्यप्रदेश व दक्षिण भारतात वनगाय, गेंडा व हत्ती हे प्राणी भटकत असलेले दिसतात. लांडगा, उंट व घोडा हे प्राणीही नंतरच्या काळात उत्तरेत भटकत असलेले दिसतात. या सर्व प्राण्यांचे मांस मानव खात होता.

मध्याश्मयुगात हत्यारांचा आकार लहान परंतु अत्यंत धारदार व टोकदार झाला होता. पुर्वीच्या आकाराने मोठी असलेली हत्यारे (हातकुऱ्हाडी व फरशा) मध्याश्मयुगात नाहीशी झाली होती. या युगातील हत्यारांच्या आकारावरून समजते की या काळातील मानव लहान लहान प्राणी जसे हरीण, माकड व रानडुक्करे या चपळ प्राण्यांची शिकार करून त्यांचे मांस खात असावा. कंदमुळे व फळे यांचाही अन्न म्हणून उपयोग होत असे. उत्तर अश्मयुगात मानवाच्या आहारात विविधता आली. या काळात वनगाय, काळवीट, मुंगुस, गेंडा, हरीण, नीलगाय यासारखे प्राणी होते. वरील प्राण्याबरोबरच उंदीर, घुशी व खारी या प्राण्यांच्या मांसाचा मानवाच्या अन्नात समावेश होत होता. मासे, कंदमुळे व फळे मानव खात असे. या काळात कुत्रा हा प्राणी मानवाला शिकारीच्या कामात मदत करीत असे. नवाश्मयुगात मानव झोपडी करून राहु लागला.

Scanned with OKEN Scanner

LATUR



मानवी जीवनात स्थिरता आल्यामुळे स्थिरता आल्यामुळे त्याचे जीवन समृद्ध बनले. मानव हा फक्त शिकारीवर अवलंबून राहिला नाही तर तो या काळात शेतीही करू लागला. दक्षिण भारतात उत्खननात प्राप्त झालेल्या अवशेषांवरून अनुमान काढता येते की येथील शेतकरी गळिताच्या धान्याचे उत्पादन होत असावा. मैसूरमधील टेक्कलकोटा येथील शेतकरी कुळिथाचे उत्पन्न काढत असे, तसेच शिकार करूनही उपजीविका करीत असे. पिकलीहाळ या ठिकाणी गाय, बैल व मेंढ्या या जनावरांची हाडे आढळून आली. त्यावरून या जनावरांच्या मांसाचा उपयोग खाण्यासाठी निश्चितच केला जात असावा असा निष्कर्ष काढता येतो. या काळातील मानव हा अन्न शिजवून खात असे. मीनवारच्या उत्खनन बुर्झोम या ठिकाणी जमिनीत खड्डे खोदून केलेल्या घराच्या तोंडाशी चूल व राख आढळून आली उत्खननात धान्याचे पीक करण्यासाठी लागणारे साधन पाटा वरवंटा मिळाले. यावरून स्पष्ट होते की या काळातील जीवन स्थिर व समृद्धशाली बनले होते.

ब) **शेती** :- नवाश्मयुगातील अर्थव्यवस्थेचे शेती व पशुपालन हे दोन प्रमुख महत्त्वाचे घटक होत. नवाश्मयुगातील मानव हा शेती करू लागला होता काश्मीरमधील शेतकरी सुरुवातीच्या काळात शेतीची लागवड अशा प्रकारची करत असावा यावदल केवळ अंदाज करता येतो. ते गव्हाच्या दांड्यात बसविले जात असत. नवाश्मयुगीन हत्यारे घासून गुळगुळीत करीत असत. कुऱ्हाडी, छन्नी आणि वाकस ही या युगातील दगडी हत्यारे होती.

Scanned with OKEN Scanner

LATUR

VEDHA
Page No. :
Date : / /

## 6) पाळीव प्राणी :-

अश्मयुगीन मानवाला प्राण्यांची शिकार करूनच अन्न मिळवावे लागत होते. मानव प्राण्यांचे कच्चे मांस खात असे. वनगाय, गेंडा, हत्ती, उंट, घोडा व लांडगा या प्राण्यांचे मांस मानव खात होता. नवाश्मयुगात पशुपालन ही मानवाची मालमत्ता ठरली. मानव अनेक प्राण्यांना पाळू लागला. कुत्रा या जंगली प्राण्याची मदत शिकारीसाठी मानवाला होऊ लागली. गाय, बैल, मेंढ्या, डुकरे व शेळ्या हे प्राणी मानव पाळत असे. पिकलीहाळ (म्हैसूर) येथे वरील प्राण्यांची हाडे सापडली. यावरून या प्राण्यांची पैदास शेतकरी करीत असावा. नवाश्मयुगात अशा पाळीव प्राण्यासाठी मोठमोठे बनवीत असत. आंध्रप्रदेशातील उटनूर या ठिकाणी 207 फूट लांबीचा व 15 फूट रूंदीचा एक गोठा सापडला असून या गोठ्यात लहान लहान विभाग पाडले आहेत. बैल, मेंढ्या व डुकरासाठी वेगवेगळी व्यवस्था असावी. रात्रीच्या वेळी जनावरांचा कोंडकूट लावून पाळीव व वस्तीचे हिंस्र पशुंपासून संरक्षण केले जात असे.

## 7) अश्मयुगीन मानवाच्या वसाहती किंवा स्थळे :-

पूर्वाश्मयुगातील मानव हा भटक्या अवस्थेत जीवन जगत असल्यामुळे तो भारतात सर्वत्र फिरला. पूर्वाश्मयुगीन हत्यारे देशात गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, म्हैसूर, आंध्रप्रदेश आणि मद्रास प्रांतात सापडली. नर्मदा नदीची खोरी, पंजाब

LATUR



राजपुताना, मध्यभारत, बंगाल, आसाम, बिहार ओरिसा, दक्षिणेतील कोकणपट्टी, कर्नाटकातील मलप्रभेचे खोरे, म्हैसूर प्रदेश आणि कर्नाटकातील बेल्लारि, उत्तर अर्काट, चिंगलपुर व कर्नुल जिल्हा या ठिकाणी अश्मयुगीन मानवाचे अस्तित्व असल्याचे दिसून येते

१) अश्मयुगीन कला :-

अश्मयुगीन प्राचीन कलावशेष आतापर्यंत उपलब्ध झाले नाहीत. मध्याश्मयुगातील कलावशेष विंध्य पर्वतातील गुहा व शिलाश्रयात दिसून येतात. त्यामध्ये कोरलेल्या आकृत्या व रंगीत चित्रे आहेत. प्रथम चित्राची आकृती टोकदार दगडाने कोरीत असत व नंतर त्या आकृतीत रंग भरत असत. अशी चित्रे शिकारीची दृश्ये असत. नवाश्मयुगात कला क्षेत्रात बराच विकास झाला मातीच्या मूर्ती, भांड्यावरील रंगीत चित्रित केलेली दृश्ये तसेच प्रस्तर खंडावर चित्रे कोरलेली व रंगविलेली असत. भाजलेल्या मातीचे बैलाची मूर्ती व पक्ष्यांचीही चित्रे दक्षिणेत आढळून आली. मध्याश्मयुगीन चित्रकलेचे अवशेष आंध्र प्रदेशातील ग्रॅनाईटच्या प्रस्तर खंडावर आढळून आले. या ठिकाणी व ती चित्रे गेरूने रंगविली. या ठिकाणी साप, मगर, हत्ती युद्धाची आणि सामूहिक नृत्याचीही चित्रे गेरूने रंगविली आहेत.

Scanned with OKEN Scanner

LATUR



अनेक ठिकाणी शिकारीची चित्रे आहेत एक शिकारि बारा शिंगे असणाऱ्या प्राण्याचा पाठलाग करत असल्याचे चित्र अंकित केले आहे. यामध्ये वाघ, जिराफ हरिण व कांगारू या प्राण्यांचे सुद्धा चित्रण केलेले आढळते. मिर्झापूर, होशंगाबाद व सिंगनपूर व कैमूरच्या डोंगरातील गुहामध्ये अशा चित्रांचे अवशेष मिळाले आहेत.



Scanned with OKEN Scanner

LATUR



Scanned with OKEN Scanner

LATUR



Scanned with OKEN Scanner



LATUR

Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner

LATUR



Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner



सापडलेली हत्यारे



मडितली येथे सापडलेली हत्




Scanned with OKEN Scanner



Scanned with OKEN Scanner

MANJARA CHARITABLE TRUST'S

# SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

## Project Work / Field Work

## *Certificate*

**This is to certify that,**

**Mr./Mrs.** Magar Parmeshwar Rdkasaheb, Gamsale Omkar, Karadi Omkar, Ratnaparkhe Akash

**has successfully completed the Project Work/ Field Work entitled**

Ashma yugin manavi jivan

**Conducted by the Department of** History **in the academic year 2022-23.**

**Project Guide**

Dr. Kamble B.M.

**Head of the Department**

Scanned with OKEN Scanner